# छात्र प्रबोधन

सौर  भाद्रपद, शके १९३४ । वर्ष १२ अंक १२
मूल्य रुपये पंधरा



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !

## दिवाळी म्हणजे फटाके-फराळ, किल्ला-आकाशकंदील आणि

# छात्र प्रबोधनचे ६ दिवाळी अंक

**(मराठी, इंग्रजी, ग्रामीण, युवोन्मेष, बोलके छात्र प्रबोधन, संगणकीय अंक)**

**कथा, कविता, ललित लेख, माहितीपर लेख, खेळ, विज्ञान प्रयोग, प्रेरणादायी लेखमाला यांचा मस्त खजिना या दिवाळीच्या सुट्टीत लुटायचाय ना? त्यासाठी तय्यार ना?**

सभासदांना त्यांचा मराठी दिवाळी अंक जवळच्या केंद्रावरून मिळेलच !
पण या खजिन्यातल्या इतर अंकांची प्रकाशनपूर्व नोंदणीही करायला विसरायचं नाहीये हं !

**– दिवाळी विशेषांकांची प्रकाशनपूर्व नोंदणी किंमत –**

| मराठी | इंग्रजी | ग्रामीण | युवोन्मेष | बोलके छात्र प्रबोधन | चारही अंकांचा एकत्रित |
|---|---|---|---|---|---|
| ₹ ४० | ₹ ४० | ₹ ३० | ₹ ४० | (Audio CD) ₹ ५० | संगणकीय (Pdf) अंक ₹ ६० |

आजच आपली व आपल्या मित्र-मैत्रिणी, चुलत-मामे-आते -मावस भावंडे यांची नोंदणी पक्की करा.

**प्रकाशनपूर्व सवलतीतील नोंदणीचा अंतिम दिनांक ५ ऑक्टोबर २०१२**

| प्रकाशनपूर्व सवलत मूल्य ₹ १५/- | ज्ञान प्रबोधिनीद्वारा प्रकाशित **दिनदर्शिका** शके १९३४- ३५, इ.स. २०१३<br>'राष्ट्रीय सौर - चांद्र - ग्रेगोरियन' असा तिहेरी संयोग |
|---|---|

वेगवेगळे **दिवाळी अंक, दिनदर्शिका व पुस्तके** यांची रक्कम भरून नोंदणी ५ ऑक्टोबरपर्यंत स्थानिक केंद्रावर करा व दिवाळी अंकासोबत ते केंद्रावरून घेऊन जा.

## ज्ञान प्रबोधिनीची कुमारांसाठी उपयुक्त पुस्तके

**समृद्ध आशय, तज्ज्ञ लेखक, आकर्षक छपाई, माफक किंमत!**

*** कथासंग्रह**
- दरवळ ४०/-
- मृद्गंध ६०/-
- बहर ५०/-
- मोहोर ६०/-
- कहाणी दोन भावांची ३०/-
- मृदुभाव जागे होता... ३०/-
- प्रेरक कथा ३०/-

*** ललित लेखसंग्रह**
- अलगुज ५०/-
- केवड्याचं पान ५०/-
- बकुळफुलं ६०/-

*** नामवंत कवींच्या काव्याविषयी रसग्रहणात्मक लेखांचा संग्रह**
- गंध मोहवी काव्याचा – भाग १ व भाग २ प्रत्येकी ७०/-

*** कविता/काव्यपंक्ती संग्रह**
- अक्षरबोली ३०/-
- कवितेच्या गावा ३०/-
- शब्दांची रत्ने ६०/-

*** विचार व कृतिप्रवर्तक लेखसंग्रह**
- स्वीकारशील स्वदेशी ५०/-
- हट्टी व्हा, हट्टी ! ५०/-
- हरित संदेश १५/-

*** भावभावनांशी निगडित लेखसंग्रह**
- तरंग मनाचे ५०/-
- जिद्दीची लोभस रूपं ६०/-

*** व्यक्तिविकासाशी निगडित पुस्तके**
- प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास ५०/-
- व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत ७०/-
- कल्पक बनू या ८०/-
- गीता-गीताई १०/-

*** अनुभवपर, प्रेरणादायी पुस्तके**
- आयुष्यातील वादळलाटा ७०/-
- कथा इस्रोची ६०/-
- आम्ही असे घडलो ८०/-

*** कृतिपर/अभ्यासपर पुस्तके**
- त्रिमितीची किमया ७५/-
- असे घटते सुंदर अक्षर १५/-
- मानसिक कसोट्यांसाठी –
  - प्रज्ञाबोध भाग ४ ६०/- (NTS साठी उपयुक्त)
  - प्रज्ञाबोध भाग ५ ७०/- (NTS साठी उपयुक्त)

*** माहितीपर पुस्तके**
- छंद आकाशदर्शनाचा ८०/-
- आपला पाऊस ३०/-

**OUR ENGLISH EDITIONS**
- * Enhancement of Intelligence through play Rs. 150/-
- * Glory of Intelligence Rs. 30/-
- * 3D Magic Rs. 80/-
- * Be Creative Rs. 100/-
- * Green Messages Rs. 20/-

**पालक-शिक्षकांसाठी उपयुक्त पुस्तके**
- * आश्वासक पालकत्व ८०/-
- * सामाजिक जाणीव संवर्धन ८०/-
- * रूप पालटू शिक्षणाचे ३०/-
- * बुद्धिवैभव २५/-
- * प्रबोधन गीते – पुस्तक २०/-
  - MP3 Audio CD ५०/-
- * गंमत मोठ्ठं होण्यातली १५०/-
- * हसत खेळत बुद्धिविकास- १ १३०/-
- * हसत खेळत बुद्धिविकास- २ १५०/-

**छात्र प्रबोधन DVD**
१४४ अंक/७५०० पाने फक्त १२५ रुपयांत

**ज्ञान प्रबोधिनीची चरित्रात्मक व वैचारिक पुस्तके**
- * राष्ट्रद्रष्टे विवेकानंद १२०/-
- * विवेकानंद-कन्या भगिनी निवेदिता ८०/-
- * हरिसिंह नलुआ ६०/-
- * ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक वि. वि. पेंडसे १००/-
- * विवेकानंदांचा राष्ट्रधर्म ६०/-
- * राष्ट्रदेवो भव ५०/-
- * समर्थ रामदास काय म्हणाले? ६०/-
- * स्मृतीतुनि स्फुरो कृती १५/-
- * महात्मा गांधींचा राष्ट्रधर्म ३०/-
- * ज्ञान प्रबोधिनी खंड – ४ १००/-

ॐ
इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

# छात्र प्रबोधन

सौर भाद्रपद, शके १९३४। वर्ष १२ अंक १२
(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २४२ वा अंक, वर्ष २१ अंक २
प्रकाशन दिनांक - १० भाद्रपद, शके १९३४/१ सप्टेंबर २०१२

## • अंतरंग •

२. **संवाद** - महेन्द्र सेठिया
३. व्यक्तिपरिचय... **कहाणी मेरीच्या जिद्दीची !** - सुरेंद्र पाटसकर
७. कथा... **'मी जागरुक'चे मुख्याध्यापिकांना पत्र** - प्रसाद सांडभोर
१०. कविता... **ऋतू सोहळे** - दत्ता हलसगीकर
११. चित्रगोष्टी - ७ ... **मुक्तहस्तचित्र** - चित्रा वैद्य
१३. पाहिलेच पाहिजे असे काही... **टिंग्या** - शैलजा देशमुख
१७. वाचलेच पाहिजे असे काही... **आसमंत** - जयश्री काटीकर
१९. **सिंहावलोकन बाराव्या वर्षाचे**
२३. **छात्र प्रबोधन दिवाळी अंक वितरण**
**मलपृष्ठ पद्य... जय वीरेश्वर** - डॉ. सुरुचि पांडे

**याशिवाय** - दिनविशेष (१६), मलपृष्ठ पद्याच्या शब्दांचे अर्थ, ओळखा पाहू मी कोण?, मुखपृष्ठ चित्रकार परिचय (२२)

या अंकातील पानांखालील काव्यपंक्ती कवी प्रभाकर साळेगावकर यांच्या आहेत.

**मुखपृष्ठाविषयी**

पश्चिम घाटातील झेंडूची बहरलेली शेती पाहून हे चित्र काढण्याची प्रेरणा मिळाली. 'कॉल ऑफ हिल्स' या चित्रमालिकेतील हे चित्र आहे. ॲक्रेलिक रंगात चाकूच्या (knife) साहाय्याने कॅन्व्हासवर हे चित्र चित्रित केले आहे.

**- चित्रा वैद्य**

**आपले व आपल्या मित्र-मैत्रिणींचे दिवाळी अंक आजच नोंदवा.**

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**कार्यकारी संपादक**
जयश्री काटीकर

**संपादक मंडळ**
शैलजा देशमुख,
नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन

**मुखपृष्ठ**
चित्र वैद्य

**आतील चित्रे**
अभय पुरंदरे, ओंकार इनामदार

**वार्षिक वर्गणी : ₹ १८०**
**द्वैवार्षिक : ₹ ३४०**
**त्रैवार्षिक : ₹ ५००**
**दशवार्षिक : ₹ १,५००**

**या अंकाची किंमत : ₹ १५**
पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा
घरपोच दिवाळी अंकासाठी- प्रतिवर्षी ₹ ४० जादा

**संपर्क पत्ता**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९
**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org
**ई-मेल**
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.**

## संवाद

***अर्थ व हेतू समजून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रिय प्रबोधकांनो,***

*मागच्या महिन्याचा 'प्रबोधिनी विशेषांक' मिळाला ना? (अंकाची पृष्ठसंख्या वाढत वाढत ८० पर्यंत गेल्याने अंक छपाईला उशीर झाला. त्यामुळे तो १ तारखेऐवजी १३ तारखेला पोस्टात पडला म्हणून तुम्हाला उशीरा मिळाला असेल, त्याबद्दल क्षमस्व!) अंक कसा वाटला? प्रबोधिनीच्या शिक्षणातले अनेक जणांचे अनुभव वाचताना आपणही प्रबोधिनीच्या उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे असे वाटले ना? आपल्या 'छात्र प्रबोधन' मासिकाच्या पलीकडे 'ज्ञान प्रबोधिनी'च्या व्यापक कामाचे दर्शन तुम्हाला त्यातून घडले असेल. पन्नास वर्षांत विविध क्षेत्रांमध्ये प्रबोधिनीचे काम विस्तारले असले तरी 'आपल्या देशाचे रूप पालटण्यासाठी' अजून खूप काम करायचे बाकी आहे. त्यादृष्टीने आपापल्या गावात 'प्रबोधिनी' सुरू करण्यासाठी तुम्ही पुढाकार घ्याल ना? तीन वर्षांपूर्वी औरंगाबादच्या शुभम् जोशीने दहावीत असताना 'छात्र प्रबोधन' दिवाळी अंकाचे 'नोंदणी व वितरण केंद्र' औरंगाबादमध्ये सुरू केले. वेगवेगळ्या शाळांमध्ये जाऊन, मित्र-नातेवाईकांशी संपर्क करून सुमारे १०० दिवाळी अंकांची नोंदणी त्याने केली. त्यानंतर दिवाळी अंकाच्या वाचकांचा मेळावाही घेतला. गेल्या २ वर्षांत विविध शिबिरेही त्याने तेथे घेतली. त्यातून एक गट जमा करून काम वाढवायचा तो प्रयत्न करतोय. या सगळ्याबद्दल त्याचे मनापासून कौतुक! तुम्हालाही तुमच्या गावात असे काहीतरी नक्कीच सुरू करता येईल. 'छात्र प्रबोधन'च्या गावोगावच्या सभासदांनी प्रबोधिनीचे काम आपापल्या गावात वाढवायलाच हवं ! आम्ही तुमच्या प्रतिसादाची वाट पाहतो आहोत.*

*तुम्हाला दगडफोड्या कारागिरांची गोष्ट माहीत आहे का? दोन कारागीर उन्हातान्हात बसून दगड फोडण्याचे कष्टाचे काम करत होते. एक प्रवासी त्या दोघांच्याही कामाकडे टक लावून बघत होता. एक जण खूपच त्रासलेला होता. मधेमधे आपल्या नशिबाला दोष देत होता. तर दुसरा मधेमधे थांबत, थोडा श्वास घेऊन, एकाग्रतेने अन् आनंदी चेहऱ्याने पुन्हा कामाला भिडत होता. त्या प्रवाशाला दोघांमधला हा फरक प्रकर्षाने जाणवला अन् म्हणून त्याने त्यांना प्रश्न विचारला, 'तुम्ही काय करताय अन् कशासाठी करताय?' पहिल्याने उत्तर दिले, 'दगड तर फोडतोय, कशासाठी ते काय माहीत नाही पण ४ जणांचं पोट भरण्यासाठी हे असं कष्टाचं जिणं नशिबी आलं बघा.' तर दुसऱ्याने उत्तर दिलं, 'मीही दगड फोडतोय, मलाही ५ जणांचं पोट भरायचं आहे. पण मी जे दगड फोडतोय त्यातून इथं एक मोठ्ठं मंदिर उभं राहणार आहे. किती भाग्यवान आहे मी!' एकाच प्रकारचे काम दोघंही करत असताना हा मनोवृत्तीतला फरक कशामुळे पडला? तर आपण जे काम करतो आहोत त्याचा हेतू काय? त्यातून काय परिणाम घडणार आहे? याचे ज्ञान आणि भान ज्याला असते त्याच्या हातून अधिक चांगले आणि आनंद मिळवून देणारे काम घडते. पटतंय ना !*

*तुमच्या रोजच्या जगण्यात तुम्ही किती गोष्टींचे हेतू समजून घेता? घरातली/शाळेतली एखादी गोष्ट का करायची, हे समजून घेऊन त्याप्रमाणे कृती करता? किती गोष्टींचे अर्थ समजून घेऊन त्या करता? साधी आपली शाळेतली रोजची प्रार्थना, समूहगीते असो किंवा घरात म्हटल्या जाणाऱ्या आरत्या असो; आपण फक्त सवयीने त्या शब्दांचा उच्चार करतो का? (तोही काही वेळेला चुकीच्या पद्धतीने). सुरुवातीला शब्दार्थ मग भावार्थ मग गर्भितार्थ... असं टप्प्याटप्प्यानं अर्थ कळत जायला हवा. आसपासची मोठी माणसं, पुस्तकं, 'छात्र प्रबोधन', इंटरनेट इ.चा उपयोग करून अर्थ समजून घ्या. कृती करता करता त्यांचा अर्थ, हेतू डोळसपणे समजून-उमजून घेत, हेतू साध्य होईल यारितीने मनापासून त्या गोष्टी करायला लागा. तुम्हाला त्या दुसऱ्या दगडफोड्या कारागिराप्रमाणे आनंद होईल अन् सुयोग्य परिणामही घडेल. काळानुरूप काही बदल करण्यासाठी आधी जे चालू आहे त्याचे अर्थ तर समजून घ्यायला हवेत ना! ते कळले तर हेतू लक्षात घेऊन तुम्ही नवीन काही करू शकाल. गणेशोत्सवात नवनवीन कार्यक्रम, नवीन आरत्या करू शकाल. या गणेशोत्सवाच्या निमित्ताने श्री गणरायाने, 'अर्थ अन् हेतू समजून घेऊन कृती करण्याची बुद्धी' तुम्हा-आम्हा सर्वांना भरभरून द्यावी हीच प्रार्थना.*

*दिवाळी अंकांचे काम जोरात चालू आहे. आपापल्या गावात अनेकांना भेटून अंकांची प्रकाशनपूर्व नोंदणी मोठ्या प्रमाणावर करणार ना?*

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**



नव्या युगाचे आभाळ गाणे, तुला आता गायचे आहे।
माझ्या चिमुकल्या रोपा, तुला झाड व्हायचे आहे।।
प्रायोजक - शंतनू पटवर्धन, टेक्सास अमेरिका

*ऑगस्ट महिन्यात लंडनमध्ये झालेल्या ऑलिंपिक स्पर्धांमध्ये भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी झाली. भारताच्या खात्यात दोन रौप्य व चार ब्राँझ अशी सहा वैयक्तिक पदके जमा झाली. सुशीलकुमार, विजयकुमार, योगेश्वर दत्त, गगन नारंग, साईना नेहवाल आणि मेरी कोम यांनी भारताची मान उंचावली. जीवनात सर्वांत खडतर वाटचाल करून ऑलिंपिकमध्ये पदक मिळविणारी मेरी कोम इतरांपेक्षा उठून दिसली. पाचवेळा विश्वविजेतेपद मिळविलेल्या व जुळ्या मुलांची आई असलेल्या मेरीच्या जिद्दीची ही कहाणी. . .*

# कहाणी मेरीच्या जिद्दीची !

**– सुरेंद्र पाटसकर**



''आय ॲम सॉरी, भारतासाठी मी सुवर्णपदक जिंकू शकले नाही.'' हे उद्गार आहेत लंडन ऑलिंपिकमध्ये बॉक्सिंगमध्ये ब्राँझ पदक मिळविणाऱ्या मेरी कोम हिचे. अगदी मनापासून आलेल्या या सच्च्या उद्‌गारांमुळे ती सगळ्यांच्या गळ्यातील ताईत बनली. तब्बल १०८ वर्षांनंतर महिला बॉक्सिंगचा समावेश ऑलिंपिकमध्ये यावेळी करण्यात आला आणि त्यात पदक मिळविण्याची कामगिरी मेरीने केली. मुळात भारतामध्ये वर्ल्ड चँपियन्सची संख्या बोटावर मोजण्यासारखी आहे. त्यातही बॉक्सिंगसारख्या खेळात करीअर करून स्वतःला सिद्ध करण्यासाठी मेरीने प्रचंड मेहनत घेतली आहे. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर तिला झगडावे लागले. आता मात्र ही परिस्थिती बदलेल आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्या भारतीय मुलींची संख्या वाढेल, अशी तिला आशा आहे. मेरीचा आतापर्यंतचा प्रवास इतरांना प्रेरणा देणाराच ठरेल.

मँगटे चुंगनेईजांग मेरी कोम अर्थात एमसी मेरी कोम हिचा जन्म मणिपूरमधील कांगथेई गावात १ मार्च १९८३ रोजी झाला. तिचे आई-वडील मँगटे टोनपा कोम आणि मँगटे अखम कोम हे झूम प्रकारच्या शेतांत शेतमजूर म्हणून काम करत असत. मेरीही आई-वडिलांना मदत करायची. लाकूड तोडणे, कोळसा तयार करणे, मासेमारी अशा कामांत ती हातभार लावायची. तसेच आपल्या दोन लहान बहिणी आणि एक भाऊ यांनाही आनंदाने सांभाळायची.

मेरीला लहानपणापासून ॲथलेटिक्सची आवड होती. आपणही ॲथलेटिक्सच्या क्षेत्रात आपले नाव झळकवू शकू, असे तिला नेहमी वाटत असे. त्यावेळी ती मोईरंगमधील लोकटाक ख्रिश्चन मिशन स्कूलमध्ये सहावीच्या वर्गात शिकत होती. पुढील शिक्षणासाठी ती मोईरंगमधीलच सेंट झेवियर स्कूलमध्ये दाखल झाली. तिथे गेल्यानंतरही तिची खेळाविषयीची जिज्ञासा जागृत होती. ॲथलेटिक्सबाबतची ओढ तिला तेथेही गप्प बसू देत नव्हती. शक्य होईल तेवढी खेळांबद्दलची माहिती घेण्याचा ती प्रयत्न करत असे. इयत्ता सातवी आणि आठवीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मेरी सेंट झेवियर्समधून इम्फाळमधील आदिमजाती स्कूलमध्ये गेली. खेळाची आवड जागृत असल्याने तिने तेथेही विविध खेळांची माहिती घेण्यास सुरुवात केली. त्यावेळी तिला महिला बॉक्सिंगची माहिती मिळाली व ती त्या खेळाकडे आकर्षित झाली. त्याच सुमारास १९९८ च्या आशियाई स्पर्धेत भारताच्या डिंकोसिंग याने चमकदार कामगिरी केली होती. त्यामुळे संपूर्ण देशातच त्याच्या नावाची चर्चा होती. त्याच्या खेळाने मेरी प्रभावित झाली. त्याचवेळी मणिपूरमध्ये राष्ट्रीय स्पर्धा होत होत्या. त्यात महिला बॉक्सिंग हा प्रदर्शनीय खेळ ठेवण्यात आला होता. त्याचाही परिणाम मेरीवर झाला आणि बॉक्सिंगमध्येच करिअर करण्याचा निर्णय मेरीने घेतला. त्यावेळी महिला बॉक्सिंगला समाजात फारशी मान्यता नव्हती. तरीही

समुद्राचं पाणी खारंच खारं।
मिठासारखं असतं म्हणे तिकडून येणारं वारं...॥
**प्रायोजक – डॉ. मुकुंद करंबेळकर, चाळीसगाव**

## *मेरी कोमची कामगिरी*

| जागतिक स्पर्धा | आशियाई महिला बॉक्सिंग स्पर्धा |
|---|---|
| **सुवर्ण पदके** | |
| २०१० - ब्रिजटाऊन | २०१२ - उल्लनबाटर |
| २००८ - निंगबो सिटी | २०१० - अस्टाना |
| २००६ - नवी दिल्ली | २००५ - काओशसियुंग |
| २००५ - पोडोल्स्क | २००३ - हिस्सार |
| २००२ - अंत्याला | |
| **रौप्य पदके** | |
| २००१ - स्क्रँटन | २००८ - गुवाहाटी |

**विशेष पुरस्कार**

**अर्जुन पुरस्कार - २००३**
**पद्मश्री - २००६**
**राजीव गांधी खेल रत्न - २००९**
**आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग परिषदेचा पुरस्कार - २००९**
**सहारा स्पोर्टस पुरस्कार - २०१०**

**विशेष उल्लेखनीय**

**आशियाई स्पर्धा -** २०१०: गुआंगझोऊ (चीन)- ब्राँझ
**ऑलिंपिक - २०१२ : लंडन - ब्राँझ पदक**

नववी उत्तीर्ण झाल्यानंतर मेरीने शाळेला रामराम ठोकून बॉक्सिंग रिंगमध्ये उतरण्याचा निर्णय घेतला. मात्र तिचे हे बॉक्सिंग प्रेम घरच्यांना पसंत नव्हते. 'बायकांनी ठोसेबाजी करणे आपल्या संस्कृतीत बसत नाही, बॉक्सिंगमुळे महिलांच्या चेहऱ्याचे सौंदर्य जाते,' असे मेरीच्या वडिलांचे मत होते. त्यामुळे तिने आपली आवड घरच्यांपासून लपवून ठेवली.'स्पोर्ट्स ॲथॉरिटी ऑफ इंडिया'चे प्रशिक्षक इबोमचा सिंह यांच्याकडून बॉक्सिंगचे प्राथमिक धडे गिरविण्यास एकीकडे मेरीने सुरुवात केली. मणिपूर महिला बॉक्सिंग स्पर्धेत ती २०००मध्ये सहभागी झाली. ती स्पर्धा तिने जिंकली, तेव्हा वर्तमानपत्रातील छायाचित्राद्वारे मेरी बॉक्सिंग खेळत असल्याची माहिती तिच्या वडिलांना झाली. गुणवत्ता पाहून वडिलांनीही मुलीचे कौतुक केले.

**जागतिक विजेतेपदाच्या दिशेने**

पहिली स्पर्धा जिंकल्यानंतर मेरीचा आत्मविश्वास दुणावला व तिने पश्चिम बंगाल विभागीय स्पर्धेतही विजेतेपद मिळविले. त्यानंतर ती आंतरराष्ट्रीय स्पर्धांत सहभाग घेऊ लागली. त्यावेळी तिचे वय होते केवळ १८ वर्षांचे. अमेरिकेत झालेली जागतिक मष्टियुद्ध स्पर्धा ही तिची पहिली आंतरराष्ट्रीय स्पर्धा. या स्पर्धेत तिने ४८ किलो गटांत रौप्यपदक मिळवून आंतरराष्ट्रीय कारकिर्दीची धडाक्यात सुरवात केली. त्यानंतर २००२, २००५ आणि २००६ अशी लागोपाठ तीन वर्षे जागतिक महिला बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदके मिळविण्याची ऐतिहासिक कामगिरी मेरीने केली.

**पतीचीही साथ**

कारकीर्द जोरात सुरू असतानाच २००५मध्ये मेरीचा विवाह ओनलर कोम यांच्याशी झाला. लग्नानंतर ओनलर यांनी तिला खेळासाठी अधिकच प्रोत्साहन दिले. ''ओनलर हे माझे फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड आहेत'', असे मेरी नेहमी सांगते. लग्नानंतर २००७ मध्ये मेरीने जुळ्या मुलांना जन्म दिला. रेचुनग्वार आणि खुप्नेवार अशी त्यांची नावे आहेत. मुलांच्या जन्मानंतरही ओनलर यांनी मेरीला खेळण्यासाठी प्रवृत्त केले. त्यामुळेच २००८ मध्ये पुन्हा तिने जागतिक विजेतेपद मिळविण्याची कामगिरी केली.

**दुर्दम्य आशावाद**

बॉक्सिंगच्या स्पर्धा आणि त्यांची तयारी यासाठी मेरी वर्षातील बराच काळ घराबाहेर असते. त्यावेळी घरची आघाडी सांभाळण्याचे काम तिचे पती करतात. २०१० मध्ये झालेल्या आशियाई स्पर्धेची तयारी करत असताना तिचा एक मुलगा आजारी पडला. तपासणी केल्यानंतर असे लक्षात आले की त्याच्या हृदयाला भोक आहे आणि त्यावर लगेचच ऑपरेशन करण्याची गरज आहे. त्यावेळी



। अभिनंदन... कुलांदेई फ्रान्सिन, भारत - 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' (ग्रामीण महिलांसाठी केलेल्या कार्याबद्दल) ।
। कै. प्रभाकर बळवंत करंदीकर स्मरणार्थ। **प्रायोजक – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे**



## लंडन ऑलिंपिक : भारताचा चढता आलेख

आतापर्यंतच्या ऑलिंपिकमध्ये भारताने सहा पदके मिळविण्याची कामगिरी कधीच केली नव्हती. लंडन ऑलिंपिकमध्ये सुशीलकुमार (कुस्ती), विजयकुमार (२५ मीटर रॅपिड फायर पिस्तुल) यांनी रौप्य, तर गगन नारंग (१० मीटर एअर रायफल), साईना नेहवाल (बॅडमिंटन), योगेश्वर दत्त (कुस्ती) आणि मेरी कोम (बॉक्सिंग) यांनी ब्राँझ पदके मिळवून नवा इतिहास लिहिला. यापूर्वी भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नॉर्मन पीचर्ड यांनी १९००च्या पॅरीस ऑलिंपिकमध्ये ॲथलेटिक्समध्ये दोन रौप्य पदके, खाशाबा जाधव यांनी १९५२ च्या हेलसिंकी ऑलिंपिकमध्ये कुस्तीत ब्राँझ, त्यानंतर लिॲंडर पेसने १९९६ अटलांटा ऑलिंपिकमध्ये टेनिसमध्ये ब्राँझ, २०००मधील सिडनी ऑलिंपिकमध्ये करनाम मल्लेश्वरीने वेटलिफ्टिंगमध्ये ब्राँझ, अथेन्सच्या २००४ मधील स्पर्धेत राजवर्धन राठोडने नेमबाजीत रौप्य मिळविले होते. याआधी सर्वाधिक पदके आपल्याला बीजिंगमध्ये मिळाली होती. त्या स्पर्धेत अभिनव बिंद्रा (नेमबाजीत सुवर्ण), विजेंदरसिंग (बॉक्सिंगमध्ये ब्राँझ), सुशीलकुमार (कुस्तीत ब्राँझ) यांनी देदीप्यमान कामगिरी केली होती. सुशीलकुमारने तर लागोपाठ दुसऱ्या ऑलिंपिकमध्ये पदक मिळविण्याचा पराक्रम केला. हॉकीमध्ये १९२८ ते १९८० या कालावधीत भारताचा दबदबा होता. या कालावधीत प्रत्येक ऑलिंपिकमध्ये हॉकीत भारताला पदक मिळाले होते. लंडन ऑलिंपिकमध्ये मात्र भारतीय संघ तळाला राहिला. सर्वाधिक अपेक्षा असलेल्या तीरंदाजीत मात्र आपल्या हाती एकही पदक लागले नाही. लंडन ऑलिंपिकमधील कामगिरी पाहून पुढील ऑलिंपिकमध्ये २५ पदके मिळविण्याचे उद्दिष्ट भारताने ठरविले आहे.

(प्रकाशचित्रे - साईना नेहवाल, गगन नारंग, विजय कुमार, सुशीलकुमार, योगेश्वर दत्त, मेरी कोम)

---

चंडिगडमध्ये मुलावर हृदय शस्त्रक्रिया होत होती आणि मेरी चीनमध्ये आशियाई स्पर्धेत खेळत होती. काळजावर दगड ठेवूनच ती चीनला रवाना झाली होती. तेथे सुवर्णपदक जिंकल्यानंतर ती लगेचच मुलाकडे धावली. पतीने साथ दिल्यामुळेच ती ही स्पर्धा जिंकू शकली असे मेरी आवर्जून सांगते.

लंडन ऑलिंपिकमध्येही तिने ज्या दिवशी ब्राँझ पदक जिंकले त्यावेळी तिच्या मुलांचा वाढदिवस होता आणि मुले घरी बसून टीव्हीवर आईचा सामना बघत होते.

कांगथेई गावापासून पाचवेळा विश्वविजेतेपद मिळविण्यापर्यंतचा मेरीचा प्रवास स्वप्नवत असाच आहे. देवावर आणि स्वतःवर असलेला गाढ विश्वास आणि दुर्दम्य आशावाद यांच्या बळावरच तिने हे यश मिळविले आहे.

**लंडनमधील कामगिरी**

जागतिक स्पर्धेतील यशानंतर मेरीचे लक्ष्य होते ते ऑलिंपिक पदक मिळविण्याचे. लंडन ऑलिंपिकमध्ये ते साध्य झाले. भारताची ती एकमेव महिला बॉक्सर ऑलिंपिकसाठी पात्र ठरली होती. पहिल्या फेरीत पोलंडच्या मिचेलझुकचा १९-१४, दुसऱ्या फेरीत टुनिशियाच्या राहिलीचा १५-६ असा पराभव करून ती फ्लायवेट या गटात उपांत्य फेरीत धडाक्यात पोहोचली व तिथेच तिने पदक निश्चित केले. उपांत्यफेरीत मेरीची गाठ जागतिक क्रमवारीत ब्रिटनच्या ॲडम्सशी पडली. ॲडम्सकडून तिला ६-११ असा पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे मेरीचे सुवर्णपदकाचे स्वप्न भंगले. परंतु उपांत्य फेरीत धडक मारणारी ती पहिलीच भारतीय महिला ठरली.

समुद्राच्या पाठीवर छोटी छोटी गावं। खेळुन झिम्मा, सांगतात नावं...।।
प्रायोजक - श्री. अमर परांजपे, सांगली

### आणखी मेरी बनविण्याचा संकल्प

आपल्याप्रमाणे इतर मुलींनाही बॉक्सिंगच्या क्षेत्रात येताना संघर्ष करावा लागू नये, अशी मेरीची इच्छा आहे. यासाठी तिने 'बॉक्सिंग ॲकॅडमी' सुरू केली आहे. त्याद्वारे नव्या 'मेरी' घडविण्याचे काम तिने सुरू केले आहे. हरियाना, मणिपूर, केरळ आणि आसामातील मुली बॉक्सिंगमध्ये आता येत आहेत. परंतु उत्तर प्रदेश आणि पंजाबातील मुली अजूनही या क्षेत्राकडे वळत नाहीत, असे ती सांगते. स्पर्धात्मक पातळीवर यशापयश हा एक भाग झाला. परंतु स्वसंरक्षणासाठी तरी मुलींनी बॉक्सिंग शिकावे, असे ती आवर्जून सांगते.

••

**– सुरेंद्र पाटसकर**
१३४८, सदाशिव पेठ, पुणे 411030
surendrapataskar@yahoo.com

## स्वामी विवेकानंद आणि सर्वधर्मपरिषद (स्मरणदिन ११ सप्टेंबर)



द आर्ट इन्स्टिट्यूट ऑफ शिकागो

स्वामी विवेकानंदांनी आपल्या देदीप्यमान कर्तृत्वाने भारतीयांच्या मनात अढळ स्थान मिळवले आहेच. त्याचबराबेर संपूर्ण जगात विशेषतः अमेरिकेत जाऊन हिंदू धर्म प्रचाराचे जे महान कार्य केले आहे त्याबद्दल अमेरिकेत नागरिकांच्या मनातही त्यांच्याविषयी नितांत आदर आहे.

११ सप्टेंबर १८९३ रोजी शिकागो येथे जी सर्वधर्मपरिषद झाली त्यात स्वामी विवेकानंदांनी आपल्या भाषणाची सुरुवात करताना अमेरिकन नागरिकांना उद्देशून फक्त पाचच शब्द उच्चारले, "Sisters and Brothers of America" हे शब्द ऐकले मात्र, सर्व श्रोते उभे राहिले आणि सतत ५ मिनिटे सभागृहात टाळ्यांचा कडकडाट सुरू होता.

नंतरही परिषदेत बोलताना स्वामींनी माणुसकीचा धर्म सांगून, सर्वधर्मसमभावाचे महत्त्व सांगून ही सभा जिंकली. अमेरिकन लोकांच्या प्रति बंधुत्वाचे नाते प्रस्थापित करून त्यांच्या मनात विश्वास निर्माण केला. त्यांचे समाज जागृतीचे काम सर्व लोकांसाठी प्रेरणादायी असल्याचे मान्य करून अमेरिकन लोकांनी त्यांच्याविषयी म्हणजेच एका भारतीयाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिकागो शहरातील ज्या सभागृहामध्ये त्यांचे हे भाषण झाले. ते सभागृह म्हणजे "The Art Institute of Chicago" आणि हे सभागृह ज्या रस्त्यावर आहे त्या रस्त्याचे "Honary Swami Vivekanand Way" असे नामकरण केले आहे. हा स्वामींचा यथोचित गौरवच आहे आणि त्यांची ही आठवण अमेरिकन जनता कायमस्वरूपी मिरवते आहे. हा हॉल सर्वांना बघण्यासाठी खुला आहे.

अमेरिकेत जाणाऱ्या प्रत्येक भारतीयाने हे आपले अभिमानास्पद वैभव बघण्यासाठी या हॉलला व रस्त्यालाही अवश्य भेट द्यावी व विवेकानंदांच्या शिकवणीचे आचरण करण्याचा प्रयत्न करावा.

••

**– डॉ. छाया पाटील**
प्रजय ९१/१/१४ सहजीवन सोसायटी,
तुळशीबागवाले कॉलनी, पर्वती, पुणे ४११००९

(प्रकाशचित्रे – मलपृष्ठाच्या आतील पानावर)



। जरूर ऐका... गजानना श्री गणराया... - गीत शांता शेळके - गायिका लता मंगेशकर।

प्रायोजक – श्री. निखिल रामचंद्र कात्रे, डोंबिवली

*शारदा विद्यालयाच्या मुख्याध्यापिकांनी विद्यार्थ्यांचे प्रश्न, तक्रारी, समस्या, अडचणी तसेच सूचना, प्रतिक्रिया इत्यादी जाणून घेण्यासाठी आपल्या कार्यालयाबाहेर 'संपर्क पेटी' बसवून घेतलीय. या माध्यमातून मुलामुलींना मनमोकळेपणाने हेडबाईंशी थेट संपर्क साधता येतो. हेडबाई दर मंगळवारी पेटी उघडून विद्यार्थ्यांची पत्रे-चिठ्ठ्या वाचतात. गेल्या आठवड्यात त्यांना नेहमीपेक्षा 'जरा वेगळी' तक्रार वाचायला मिळाली...*

# 'मी जागरुक' चे मुख्याध्यापिकांना पत्र

**- प्रसाद सांडभोर**

दि. १८/८/२०११

प्रति, मा. रजनी रणदिवे
मुख्याध्यापिका,
श्री शारदा विद्यालय.
विषय : इयत्ता पहिलीच्या हस्तकला / ओरिगामी अभ्यासक्रमातील आवश्यक बदलाबाबत
आदरणीय मुख्याध्यापिका,

आम्ही आपल्या शाळेच्या (माध्यमिक विभाग) इयत्ता सातवीत शिकणारे विद्यार्थी आहोत. आजूबाजूच्या जगात घडणाऱ्या घटना व घडामोडींवर कृतिशील प्रतिसाद नोंदविण्यासाठी आम्ही पाच जणांनी एकत्र येऊन 'मी जागरुक' गट स्थापन केला आहे. आपल्या शाळेतील (प्राथमिक विभाग) इयत्ता पहिलीच्या हस्तकला/ओरिगामी विषयाच्या अभ्यासक्रमातील त्रुटी आपल्या निदर्शनास आणून देण्याकरिता आम्ही सदर पत्र लिहीत आहोत.

आमच्या गटातील सदस्य जाई हिचा लहान भाऊ जय नुकताच आपल्याच शाळेत इयत्ता पहिली 'अ' मध्ये दाखल झाला आहे. गेल्या आठवड्यात त्याच्या वर्गात त्याला हस्तकलेच्या तासाला कागदाची होडी बनविण्याची कृती शिकविण्यात आली. जयने घरी जाऊन पुन्हा तशीच होडी बनवायचा प्रयत्न केला. परंतु संपूर्ण कृती न आठवल्याने त्याने जाईची मदत घेतली. जयला होडी-कृती समजावून सांगत असताना जाईला जाणवले की जयला ओरिगामी विषयात विशेष रस आहे. मग तिने त्याला अजून एक-दोन कृती शिकवल्या. त्यावेळी जयशी झालेल्या बोलण्यातून असे निदर्शनास आले की शाळेत हस्तकलेमध्ये सर्वप्रथम होडीची कृती शिकविण्यात येते. त्यानंतर बेडूक, पोपट, कपाट, टेबल, बॉक्स, फुगा, झुंबर, इ. विविध ओरिगामी-हस्तकला प्रकार शिकविले जातात. मात्र या सगळ्यात कागदाचे विमान बनविण्याच्या कृतीचा समावेश करण्यात आलेला नाही.

जाईने हा मुद्दा आमच्या साप्ताहिक चर्चेत (बुधवार दि. ९/८/२०११) मांडला असता आम्ही सर्वांनीच आमचे हस्तकलेचे तास आठवण्याचा प्रयत्न केला. आम्हाला सर्वप्रथम कोणती कृती शिकवली होती ते सांगता येत नाही; पण कागदी विमान, बाण मात्र शाळेच्या तासाला कदापि घेतले गेले नाहीत. रूपेशला त्याच्या मोठ्या भावाने कागदी विमान उडवायला शिकवले तर जाई, गंधार व करण यांच्या घरातील वडिलधाऱ्यांनी त्यांना कागदी बाणाची कृती शिकवली. मीनलला त्या दिवसापर्यंत कागदाचे

विमान कसे करतात हे माहीतच नव्हते ! तिला कृती शिकविताना आम्ही या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन एक सर्वेक्षण करण्याचे ठरविले.



या सर्वेक्षण उपक्रमातून



काही धक्कादायक माहिती उपलब्ध झाली आहे. ती पुढीलप्रमाणे- इ. पहिली ते चौथीतील ९८% मुलांना कागदाची होडी बनविता येते. तर कागदाचे विमान केवळ ५२% विद्यार्थ्यांना जमते. (यात इ. चौथीच्या विद्यार्थ्यांचा टक्का सर्वाधिक आहे.) याउलट इ. ५ वी ते ७ वीमधील ९६% विद्यार्थ्यांना विमान बनवता येते तर ८२% विद्यार्थ्यांनाच होडीची कृती तंतोतंत आठवते. एकत्रित माहिती पाहता विमानाची कृती माहीत असणाऱ्यांपैकी ५४% विद्यार्थी म्हणतात की त्यांना त्यांच्या घरातील मोठ्या व्यक्तींनी कागदाचे विमान करायला शिकवले. तर उर्वरित ४३% मंडळींनी ही कृती आपापल्या मित्रपरिवारातून आत्मसात केली आहे.

('कागदाची होडी विरुद्ध कागदी विमान' या 'मी जागरुक' च्या सर्वेक्षण उपक्रमाचा विस्तृत तपशील पत्रासोबत जोडला आहे.)

वास्तविक पाहता, कागदाचे विमान बनविणे हे होडी बनविण्यापेक्षा तुलनेने सोपे आहे. कारण-
१. होडी बनविण्यासाठी चौरसाकृती कागद आवश्यक असतो. तर कागदी विमान सहज उपलब्ध होणाऱ्या आयताकृती कागदातून बनते. (परिणामी कागद फाडण्याची गरज पडत नाही.)
२. कृतीमधील घड्यांची संख्या होडीकरिता सहा तर विमानासाठी चार इतकी आहे.

''ओरिगामी व हस्तकला विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देत त्यांना नवनिर्मितीचा आनंद देण्याकरिता शिकविल्या जातात.'' (संदर्भ : सौ. शरयू भिसे, प्राथमिक विभाग शिक्षिका) त्यानुसार कागदी होडीचे सोपे असे जास्तीत जास्त चार प्रकार ज्ञात आहेत – साधी होडी, नांगर होडी, राजाराणीची व जोड होडी. याउलट कागदी विमानांचे असंख्य प्रकार व नानाविध सोप्या कृती आजवर शोधण्यात आल्या आहेत. होडी बनविताना तंतोतंत घड्या घालण्याशिवाय इतर काही विचार होत नाही. याउलट कागदाचे विमान/बाण बनविल्यास तो हवा तसा उडावा यासाठी पंखांना वेगळा आकार देणे, नाकाला टाचणी लावून वजन वाढविणे इ. गोष्टी करून पाहताना डोक्याला चालना मिळते.

कागदाची होडी बनवली की ती थेट चिकटबुकात चिकटते. फारफार तर पावसाळ्यात मैदानावरील पाण्याच्या डबक्यात होडी सोडून आपण निर्मिलेली वस्तू पाण्यावर तरंगताना पाहण्याचा आनंद घेतला जातो. कागदाचे विमान बनविल्यावर मात्र ते कधीही-केव्हाही-कुठेही उडवून सर्जनशील आनंद मिळविता येऊ शकतो.



। आदरांजली... कॅप्टन लक्ष्मी सेहगल - २३ जुलै २०१२
(आझाद हिंद सेनेतील पहिल्या महिला कॅप्टन) ।
। डोळस व्हा आणि हिंमतीने पुढे चला !। **प्रायोजक – डॉ. सतिशचंद्र गोरे, पुणे**

*अशा प्रकारे तुलनात्मकदृष्ट्या कागदाचे विमानच होडीपेक्षा सरस ठरते. असे असूनही कोणतीही शाळा आपल्या हस्तकला विषयात विमानकृती शिकवत नाही. ती सोयीस्करपणे वगळण्यात येते. असे का?*

*उत्तर मिळविण्याकरिता 'मी जागरुक' ने काही शिक्षकांची भेट घेतली. आपल्याच शाळेतील कलाशिक्षिका रूपाली पवार म्हणाल्या,*

*''विमान बनवणे सोपे असल्याने ते कोणीही – कधीही करू शकते. शिकवण्याची काय गरज?''*

*तर प्राथमिक विभागातील शिक्षिका, सौ. भिसे म्हणाल्या की, ''कागदी विमान विद्यार्थ्यांना आधीपासूनच येत असते. होडी तशी नवीन असते.'' (सर्वेक्षणाच्या मदतीने या विधानातील फोलपणा लक्षात येईल.)*

*जवळच्याच विद्याविहार प्रशालेच्या श्रीमती पाटील घाबरत म्हणाल्या, ''जर विमान वर्गात शिकवले तर सर्वजण प्रचंड कचरा करतील.'' (होडीसाठी चौकोन तयार केल्यावर उर्वरित कागदी पट्टी सरळ बाकाखाली टाकली जाते असे 'मी जागरूक' चे निरीक्षण सांगते.)*

*इ. सातवीचे अध्यापक श्री. रमेश कांबळे म्हणाले, ''वा: म्हणजे वर्गात शिक्षकांवर सोडायचे अस्त्र शिक्षकांनीच शिकवायचे?''*

*(हा एक वेगळा मुद्दा आहे. नावडत्या शिक्षकांना त्रास देण्यासाठी काही गुंड प्रवृत्तीच्या मुलांकडून कागदी बाणांचा वापर केला जातो. अशामुळे कागदी विमान हकनाक बदनाम होत आहे. परंतु आम्हाला वाटते, याउलट जर ही कृती स्वत: शिक्षकांनीच आवर्जून विद्यार्थ्यांना शिकवली तर हे गुंड प्रवृत्तीचे प्रमाण आपसूकच कमी होईल. 'कागदी विमान – शिक्षकांविरोधी अस्त्र' असे म्हणत विमानाची कृती विद्यार्थ्यांपासून लपवून ठेवण्याच्या शाळेच्या प्रयत्नांचा आम्ही कठोरपणे निषेध करू इच्छितो.)*

*हे दाखले देऊन आम्ही आपणाला ही विनंती करीत आहोत की इयत्ता पहिली या हस्तकला/ ओरिगामी अभ्यासक्रमात विमानाची कृती समाविष्ट करण्यात यावी. तसेच ती सर्वप्रथम शिकवली जावी. नांगर टाकायची होडी शिकवून विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती व कृतिशीलता जमिनीशी जखडून ठेवण्यापेक्षा त्यांना कागदाच्या विमानासोबत मुक्त–स्वच्छंदपणे विहरू द्यावे. शाळेचा सकारात्मक प्रतिसाद विद्यार्थ्यांना नवनिर्मितीची स्वप्ने पाहत अवकाशाला गवसणी घालण्यासाठी निश्चित प्रेरक ठरेल.*

आपले विनम्र,

**मी**नल जगताप, **जा**ई जोशी, **गं**धार देशपांडे, रूपेश दोरखंडे, **क**रण कदम

(सर्वजण : इ. सातवी ब)

संदर्भ : पुढील संकेतस्थळावर कागदी विमानांच्या नानाविध कृती उपलब्ध आहेत. कृपया त्यांना भेट द्यावी.
www.amazingpaperairplanes.com,
www.10paperairplanes.com

••

**– प्रसाद सांडभोर**
१३ अ, विजयश्री सोसायटी, महेश विद्यालयाजवळ,
कोथरुड, पुणे 411038
sandbhorprasad@gmail.com

# ऋतू सोहळे

– कै. दत्ता हलसगीकर



अंध मुलांच्या एका शाळेत
मी देत होतो व्याख्यान
सहा ऋतू विभ्रमाचे...निसर्गरूप लावण्याचे,
नाद गंध स्वाद स्पर्श सुखाचे.
मी म्हणालो मुलांना,
''दिवसाचे चार पदर असतात ठळक
सकाळ, दुपार, संध्याकाळ आणि रात्र
तुम्हाला अनुभव कधी आहे का या पदरांचा?''
तर दहाबारा वर्षाचा मुलगा उठून म्हणाला,
''मला तर सगळंच कळतं, त्यातल्या त्यात सकाळ.''
''कशी कळते तुला सकाळ?''
''उठून अंगणात येतो तर गोड वारा
बिलगतो अंगाला झुळझुळा
पाखरं किलबिलतात समोरच्या झाडावर
आई सडा घालीत असते;
चुबुक चुबुक आवाज पाण्याचा
बाबा पूजा करीत असावेत - आरती होते
आणि नाजूक घंटीचा किणकिण नाद
उदबत्तीचा छान सुवास
स्तोत्र म्हणत आजोबा आतल्या खोलीत बसलेले
दूरच्या देवळातून घुमणारा ओंकार
'दूधऽ' अशी आरोळी देणाऱ्या
भैय्याची सायकल घंटी
आणि अंगणातल्या वेलीवरच्या फुलांचा सुवास
कळते की सकाळ झाली आहे.''
त्या अंध मुलाचा पापा घेतला मी जवळ जाऊन
एक हरवले तर दुसरे सापडलेय त्याला
प्रकाशाने चकवले पण नाद गंध स्पर्शाचे वरदान दिले.
मुलगा खूप देखणा दिसला.

••

('छात्र प्रबोधन'च्या वाचकांसाठी ज्येष्ठ कवी
कै. दत्ता हलसगीकर यांची एक बोलकी कविता.)



। दिनविशेष... ५ सप्टेंबर शिक्षक दिन ।

प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे

# चित्रगोष्टी ७

चित्रा वैद्य

## मुक्तहस्तचित्र

चित्रकलेची आवड असणाऱ्या व्यक्तीच्या हातात कागद-पेन्सिल किंवा पेन आले की आपोआप त्याच्या हातून काहीतरी गिरगिटणे चालू होते. त्यातून काही वेळा सुंदरशी नक्षी तयार होते. वर्गात अभ्यास चालू असताना सहजच शेवटच्या पानावर काही आकार काढले जातात. त्यात पेन्सिल शेडींग केले जाते किंवा पेनने रंग भरला जातो. फोनवर बोलता बोलता फोनच्या डायरीत मी अशी बरीच पाने नक्षीने भरली आहेत. हा असा फावल्या वेळातला 'टाईम-पास' चित्र काढण्याच्या दृष्टीने खूप उपयोगी पडतो. यामुळे आपल्या हाताला आपोआपच वळण लागते. कठीण वळणदार आकार आपण सहजपणे काढायला लागतो. अशा आकारांचा उपयोग आपण भेटकार्ड, मेंदीची नक्षी, ताटाभोवतालची रांगोळी, घराबाहेर अंगणातील मोठी रांगोळी इ. अनेक ठिकाणी करू शकतो. अशा गोष्टी जमल्यावर त्यातून मिळणारा आनंद अवर्णनीय असतो. मुक्तपणे काढलेल्या चित्रातली मजाच काही वेगळी असते.

ग्रेड परीक्षेतही मुक्तहस्तचित्र असा एक विषय असतो. त्यासाठी या सरावाचा खूप उपयोग होतो. यात कोणत्याही भौमितिक साधनांचा वापर न करता केवळ पेन्सिल हातात घेऊन दिलेल्या चित्राची मोठ्या प्रमाणात प्रतिकृती निर्माण करायची असते. हे रेखाटन करते वेळी तोल, लय व प्रमाण या गोष्टी लक्षात घेऊन सफाईदार रेषा, वक्र रेषा काढता येणे आवश्यक आहे. समअंगी मुक्तहस्तचित्रामध्ये चित्राच्या मध्यभागी उभी रेषा काढली असता होणारे दोन भाग समान, आरशातल्या प्रतिबिंबासारखे दिसतात. विषमअंगी मुक्तहस्तचित्रात लयदार अलंकरणात्मक आकृती असते; परंतु त्याचे समान भाग होत नाहीत.

मुक्तहस्त चित्राचा प्राथमिक सराव होण्यासाठी वेगवेगळ्या लयदार आकारांचे मोठ्या आकारात वहीत रेखाटन करावे. हळूहळू सरावाने रेषांची लय आपल्याला सापडू लागते. नंतर कागदाच्या मध्यभागी उभी रेषा काढून तिच्या एका बाजूला स्वत:च एखादे लयदार रेखाटन करावे व तसेच्या तसे रेखाटन प्रतिबिंब दुसऱ्या बाजूला काढण्याचा प्रयत्न करावा. अशा सरावामुळे हात व डोळे यांना वळण लागते व दिलेल्या आकृतीची नीटनेटकी प्रमाणबद्ध प्रतिकृती तयार करण्याच्या क्षमतेचा विकास होतो.

एलिमेंटरी परीक्षेत काढलेली आकृती पेन्सिलीने गडद करायची असते अथवा काळ्या रंगाने रंगवायची असते. इंटरमिजिएट परीक्षेत मात्र रंगीत चित्र दिलेले असते त्याप्रमाणे हुबेहुब रंगकाम करायचे असते. परंतु सफाईदारपणापेक्षा रेखांकन व प्रमाणबद्धतेला अधिक महत्त्व असते.

**समअंगी चित्र रेखाटन करण्याची पद्धत :**

प्रश्नपत्रिकेतील दिलेल्या चित्राचे नीट निरीक्षण करावे. त्या चित्राची मध्यरेषा आखून घ्यावी. चित्र उभट असल्यास आपला कागद उभा धरावा. चित्रातील टोके, वळणे व आकार लक्षात घेऊन त्यांना स्पर्श करणाऱ्या उभ्या-आडव्या रेषा प्रश्नपत्रिकेवरच आखून घ्याव्यात. यानंतर उत्तरपत्रिकेवर कागदाच्या मध्यभागी मध्यरेषा आखून घ्यावी. दिलेले चित्र किती पट मोठे करायचे आहे हे ठरवून घेऊन सर्व मापे तेवढ्याच पटींनी वाढवून उत्तरपत्रिकेवर आधाररेषा काढाव्यात. नंतर दिलेली आकृती पूर्ण करावी.


**विषमअंगी मुक्तहस्तचित्र रेखाटण्याची पद्धत :**


प्रथम प्रश्नपत्रिकेवर दिलेल्या चित्राच्या चारही बाजूंना स्पर्शणाऱ्या रेषा अशा आखाव्या की एक आयत तयार होईल. नंतर चित्रातील प्रमुख टप्प्यांना स्पर्श करणाऱ्या उभ्या व आडव्या रेषा आखा. चित्राच्या आकृतीप्रमाणे कागद उभा किंवा आडवा धरून त्यावर निश्चित केलेल्या मापाने पुसट आयत काढावा. नंतर टप्प्या टप्प्याने उभ्या-आडव्या संदर्भरेषा काढून चित्र पूर्ण करावे.

रेषा जरी तीच ती, रंग भरूया नवे नवे। रंग जरी तेच ते, चित्र काढुया नवे नवे।।

**प्रायोजक –स्टॅटफिल्ड इक्विपमेंट, पिरंगुट, पुणे**







**नक्षीदार सराव** **विषमअंगी मुक्तहस्तचित्र** (ग्राफ पद्धत) **व समअंगी मुक्तहस्तचित्र**

विषमअंग चित्र काढण्याची आणखी एक पद्धत म्हणजे ग्राफ पद्धत. चित्राचे समान भाग करून चित्र विस्तारित करणे. या पद्धतीत पूर्वीप्रमाणेच आयत तयार करून घ्यावा. परंतु त्या आयताकृतीचे चार किंवा आठ समान भाग करावेत. तसाच आयत ठरवलेल्या पटीत उत्तरपत्रिकेवर काढून त्याचेही तेवढेच भाग पाडावेत. प्रश्नपत्रिकेतील एकेका चौकोनाचे निरीक्षण करून त्या त्या चौकोनात चित्राचा जो भाग आहे तोच बरोबर उत्तरपत्रिकेतील त्या चौकोनात विस्तारित स्वरूपात काढावा. याप्रमाणे सर्व चित्र पूर्ण करावे.

या सर्व पद्धतींचा वापर सरावापुरता करावा. नंतर ग्राफ पद्धतीशिवायही चित्राचे मुक्त रेखाटन करता आले पाहिजे.

या प्रकारे चित्राचे रेखाटन पूर्ण झाल्यावर प्रश्नपत्रिकेतल्या चित्राच्या रंगाच्या आधारे ते रंगवावे. मुक्तहस्तचित्राचे रंगलेपन सपाट पद्धतीनेच करायचे असते. त्यात शेडिंग अथवा पोत दाखवायचा प्रयत्न करू नये. रंगकाम सपाट होण्यासाठी पोस्टर कलरचा वापर करावा. प्रश्नपत्रिकेतल्या चित्रामधले काही रंग तयार रंग नसतात. वेगवेगळ्या छटांच्या मिश्रणातून ते तयार केलेले असतात. असे रंग तयार करण्यासाठी वेगवेगळ्या मिश्रणांची चाचणी घेऊन योग्य तो रंग तयार करावा. म्हणजेच दिलेल्या वेळात चित्र पूर्ण करण्यासाठी योग्य त्या सरावाची गरज असते.

या सप्टेंबर महिन्यातच चित्रकलेच्या परीक्षा आहेत. तुमच्यापैकी जे या परीक्षेला बसणार असतील त्यांनी योग्य ती तयारी करावी. परीक्षेला लागणाऱ्या सर्व साहित्याची यादी करून घेऊन आदल्या दिवशीच बॅग तयार ठेवावी. एलिमेंटरीला दर दिवशी तीन पेपर असतात. तिसऱ्या पेपरसाठीही तेवढ्याच उत्साहाने विचारपूर्वक चित्र तयार करावे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अगदी आत्मविश्वासाने परीक्षेला जावे. आपण वर्षभर जी तयारी केली आहे; त्याच पद्धतीने पेपर सोडवावा. आजूबाजूच्या मुलांचे बघून नवीन प्रयोग करायला जाऊ नये. दिलेल्या वेळेचा पूर्ण उपयोग करून चित्र जास्तीत जास्त उठावदार करण्याचा प्रयत्न करावा. चित्रकला परीक्षेत चांगली ग्रेड मिळणे महत्त्वाचे आहे हे खरेच; परंतु खरोखरच या परीक्षेमुळे आपली चित्रकलाविषयाची सर्वांगीण प्रगती होणे जास्त महत्त्वाचे असते. याचा फायदा आपल्याला नक्कीच आयुष्यभर होतो. पाया भक्कम असलेली इमारत कायम भक्कम राहाते हेच खरे!

••

**– चित्रा वैद्य**
ए-३/श्रीकुंज सोसायटी, हनुमान मार्ग,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई -57
info@artist-chitra.com

(जास्तीची चित्रे मलपृष्ठाच्या आतील पानावर)



। अभिनंदन... ज्येष्ठ संशोधक, साहित्यिक रा. चि. ढेरे - 'रवींद्रनाथ टागोर सन्मान'।

**प्रायोजक – श्री. गौरव सहस्रबुद्धे, डोंबिवली**

**पाहिलेच पाहिजे असे काही...**

*एखादा चित्रपट पाहिल्यानंतर दीर्घकाळ आपल्याला हुरहूर लावून जातो. अगदी तस्सचं २००८ साली आलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त 'टिंग्या' या चित्रपटाविषयी वाटते! 'चितंग्या' हा बैल म्हणजे अगदी टिंग्याच्या कुटुंबाचाच एक घटक! टिंग्याचा तर जीव की प्राण! टिंग्या आणि चितंग्याच्या मधल्या कोवळ्या नात्याची कथा म्हणजे टिंग्या!*
*काय मग, या सुट्टीत पाहाणार ना टिंग्या?*



टिंग्या आणि त्याचा बैल चितंग्या

# टिंग्या

**– शैलजा देशमुख**

दोस्तांनो, ही गोष्ट आहे टिंग्याची आणि त्याचं सर्वस्व असलेल्या चितंग्याची! ओझरजवळच्या मांडवे गावात ही कथा घडते. सात-आठ वर्षांचा टिंग्या आणि त्याचा थोडा मोठा भाऊ पप्या हिरव्या माळरानावरच्या मोकळ्या पायवाटांवरून पळत येताना दिसतात. त्यांचं घर गावापासून थोडं दूर उंच टेकाडावर! शेजारी युसुफचं घर. त्याची मुलगी रशिदा ही टिंग्याची खास मैत्रीण. टिंग्याच्या घरी गाभण असलेली गाय आता केव्हाही बाळाला जन्म देणार अशा अवस्थेत. तिचं बाळ गोऱ्हाच असणार हा टिंग्याचा विश्वास आहे. टिंग्या गाईच्या गळ्यात हात घालून सारखा घोकत असतो.'नव्या वासराचं नाव चितंग्याच ठेवायच हां!' टिंग्याची बडबड ऐकताना चिंग्याची माय आणि बा गंभीर होऊन भूतकाळात हरवून जातात. आणि सुरू होते टिंग्या आणि चितंग्या यांच्यातील कोवळ्या नात्याची कथा!

२००८ साली आलेल्या 'टिंग्या' या मराठी चित्रपटाची ही सुरुवात. टेकडावरची टिंग्या आणि रशिदाची झोपडीवजा घरं; डुलणाऱ्या गावातून खडबडीत पायवाटेवरून मुक्तपणे वावरणारे टिंग्या आणि पप्या, त्यांची बैलजोडी चितंग्या आणि पतंग्या! सुरुवातीच्या एका क्षणात आपण टिंग्याच्या घरी पोहोचतो. त्याच्या घरातली सुखदुःख काही क्षणांपुरती आपली होतात. जेमतेम पोटापाण्यापुरत्या शेतीवर भागवणाऱ्या शेतकऱ्याच्या अडचणी, त्यावर मात करण्याची त्याची धडपड; टिंग्याचे बाबा-'कारभारी' यांच्या व्यक्तिरेखेतून आपल्यापर्यंत पोहोचते.

ऐन नांगरणीचे दिवस. दारात बियाणाचे बटाटे येऊन पडलेले. आता हे बटाटे लावायचे; येईल त्या पिकातून जुनं कर्ज फेडायचं, घरादाराला पुरेलसं अन्नधान्य घ्यायचं, मुलांचे कपडे, वह्या-पुस्तकं, कंपास... अन् काय काय! सगळी स्वप्नं त्या पोत्यात दडलेली. नेमकं अशातच आक्रीत घडतं. शेतावरून परतणारा चितंग्या संध्याकाळी घरी परतत नाही. टिंग्या त्याला शोधायला जातो. रात्र होते. ना टिंग्या परततो, ना चितंग्या... पप्या आणि कारभारी त्यांना शोधायला बाहेर पडतात. तर दूरवरून टिंग्याचा आक्रोश कानी पडतो... 'बा, आपला चितंग्या आडात पडलाय हो!'

सगळा गाव मदतीला लोटतो. चितंग्याला दोर बांधून वर काढलं जातं. त्याचा पाय जायबंदी झालेला असतो. त्याला घरी आणल्यावर गरम पाण्याचा शेक, हळदीचा लेप इ. उपाय केले जातात. चितंग्याला बरं वाटावं म्हणून सर्वजण झटतात, पण व्यर्थ!



प्रायोजक – व्ही. व्ही. आर्किटेक्ट, प्रा. लि., पुणे



चितंग्याला थोडं बरं वाटल्यावर कारभारी म्हणजे काबा त्याला नांगराला जुंपतो. कारण या ऐन कामाच्या धामधुमीच्या काळात त्याला बैल कोण देणार? बिचारा चितंग्या... जखमी पायाने औत ओढणं नाही जमत त्याला... तो मटकन खाली बसतो. त्याला कसाबसा उभा करून घरी आणतात. पण काबाच्या जिवाला घोर लागलेला - वेळीच बटाटे लावता नाही आले, तर मोड येऊन सगळं बियाणं वाया जाईल! नवा बैल घ्यायचा, तर कमीतकमी १०-१२ हजार रु. हवेत. कुठुन आणायचे पैसे? सावकाराला विचारावं, तर पहिलंच कर्ज फिटलेलं नाही. शेजारचा युसूफ तसा खूप जवळचा दोस्त ! पण त्याच्याकडेही या क्षणी मोकळे पैसे नाहीत. काबाचा जीव रानभरी होतो. गावातला दुसरा मित्र त्याला व्यवहारी सल्ला देतो,

''काबा, आता चार दिसांनी गुरांचा बाजार हाये - तवा चितंग्याला विकून नवीन जित्राब घे... दुसरा काय बी विलाज नाय बग गड्या !''

काबालाही ते पटतं; पण 'चितंग्याचा जन्म टिंग्याच्या बरोबरीचा ! शेतकऱ्याला आपली गुरं मुलांसारखीच; घरातलं माणूस थकलं, बिनकामाचं झालं, तर आपण त्याला सोडतो का?' काबा कावराबावरा होतो; पण परिस्थितीपुढे त्याचा नाईलाज होतो. 'बिनकामाच्या चितंग्याला कोण विकत घेणार? शेवटी त्याला खाटकालाच विकावं लागणार !' बा आणि आयेचं रात्री चाललेलं बोलणं ऐकून टिंग्या जिवाच्या आकांताने म्हणतो, 'बा, काय बी झालं तरी चितंग्याला नाय विकायचा !!' माय त्याच्या समाधानासाठी म्हणते,

''होय रे बाबा टिंग्या, नाय विकायचं चितंग्याला !''

दुसरा दिवस उजाडतो. इतक्यात शेजारी रशिदाच्या घरी तिची म्हातारी आज्जी रात्री दगडाला अडखळून पडते. पिकलं खोड... ते निमित्त पुरतं.. म्हातारीला आपला शेवटचा दिस जवळ आल्याचं कळतं... पण घरच्यांची माया तुटते का? दूर तालुक्याच्या गावाहून डागदर बोलावला जातो. टिंग्याच्या मनात 'नानीला डागदर आणला मग आपल्या चितंग्याला का नको?' हा विचार पक्का बसतो. डागदरांच्या मोटरसायकलवर त्यांचं नाव कोरलेलं... दुसऱ्या दिवशी टिंग्या ओतूरकडे निघतो. रस्ता कुठे माहीत? पण बैलगाडी, ट्रॅक्टर, घोडेवाला मिळेल त्या वाहनातून प्रवास करत जिवाच्या कराराने टिंग्या ओतूरला पोहोचतो... दवाखाना शोधून थेट डागदर सायबांम्होरं उभा राहातो. 'आमच्या चितंग्याला बघायला तुम्ही यायला हवं,' म्हणून रडत गळ घालतो. बैलावर असलेला त्याचा जीव बघून गुरांचा डॉक्टर असलेल्या आपल्या मित्राला ते फोन करतात. टिंग्या गुरांच्या डॉक्टरांना घेऊन येतो. चितंग्याला औषधपाणी देऊन बरं करण्याइतका वेळ काबाच्या हातात नाही. टिंग्याच्या या उद्योगाने तो वैतागतो. बायको-मुलांवर राग काढतो. टिंग्याची माय बिचारी दिसभर स्वैपाकपाणी, झाडलोट, शेण गोळा करणं, शेतात काम करणं यांत गुंतलेली ! - तिला क्षणाची उसंत नाही. नवऱ्याच्या आकांडतांडवापुढे बिचारी काय करणार? पण काबाही मनाने प्रेमळ, भाबडा... टिंग्याचा जीव चितंग्यात अडकलेला, तर त्याचा या दोघांच्यात... काय करावं? काही दिवसांपूर्वी त्याच्या जवळच्या एका शेतकऱ्यानं परिस्थितीने गांजून आत्महत्या केलेली. क्षणभर तोही निराश होतो. टिंग्याची माय त्याची समजूत घालते; 'अवो, असं वेडंबांगडं मनात आणू नका, व्हइल समदं ठीक !'

उद्या बाजाराचा दिवस. उद्या चितंग्याला विकायला न्यायचं. इकडे शेजारी नानी मरायला टेकलेली ! हुशार टिंग्याचं डोकं भलतीकडेच धावतं ! 'उद्या नानी मेली



। दिनविशेष... ८ सप्टेंबर - जागतिक साक्षरता दिन ।

प्रायोजक – श्री. श्रीकांत कुलकर्णी, ठाणे

तर... बा बाजाराला जाणार नाही... चितंग्याला इकणार न्हाइत मरू दे नानी लवकर...!' टिंग्याला खोकल्याची दवा म्हणून रशिदा आज्जाची दवा... म्हणजे दारु प्यायला देते आणि त्या नशेत टिंग्याच्या मनातले हे विचार तो बोलून दाखवतो. रशिदाला खूप वाईट वाटतं. टिंग्याने कितीही धिंगाणा केला तरी चितंग्याला बाजारला न्यायचा क्षण येतोच. मात्र टिंग्याने त्या प्रसंगी शाळेत जावं म्हणून आई त्याला खाऊला पैसे देते... पण टिंग्याला सगळं वास्तव समजलंय. तो शाळेत जात नाही.

मृत्यूशय्येवर असलेल्या नानीला तिचे दागिने घालून सजवलं जातं... तर चितंग्याचीही ही जणू मरणयात्रा सुरू होणार! त्याच्या शिंगाना घासून चकचकीत करून, गळ्यात घुंगरं घालून सजवलं जातं. पप्या चितंग्याचा कासरा धरून ओढतो आणि टिंग्याला चितंग्याच्या पाठीमागे फटके देऊन त्याला चालवायला सांगतो. टिंग्या काठीचे फटके स्वत:च्याच पायावर मारतो... तोंडाने म्हणत राहातो... 'चाल, चाल रे चितंग्या!' बाजारात चितंग्याचा सौदा दिवसभर पटत नाही. नवा बैल घ्यायला हवी तशी किंमत कुणीही देऊ करत नाही. शेवटी काबा म्हणतो,

''चला रं पोरानु, चितंग्याला घरी घेऊन!'' टिंग्याचा आनंद गगनात मावत नाही; पण शेवटच्या क्षणी कसायाचा मध्यस्थ पुन्हा येतो आणि एकदाचा सौदा पटतो. चितंग्याला त्याच्या स्वाधीन करायला लागतं. टिंग्याचा आक्रोश हताश मनाने पाहणारा काबा, त्याची समजूत घालू पाहातो.

...शेवटी तिघेजण नवा बैल घेऊन घराकडे परततात. शेजारच्या नानीचा मृत्यू झालाय. तिच्या अंत्ययात्रेसाठी माणसं जमलेयत. चितंग्याही गेलाय... पण नियतीचं चक्र चालूच असतं.

चित्रपटात पुन्हा सुरुवातीचं दृश्य... घरच्या गायीला गोऱ्हा झालाय. टिंग्या त्याला प्रेमाने कुरवाळतोय... त्याचं नाव चितंग्याच ठेवायचं म्हणून त्याचा हट्ट चालूच ! सगळेजण खूप खुशीत... तिकडे रशिदालाही भावंडं होणार आहे... जीवन-मरणाचं चक्र चालूच राहातं... 'आपण गेलेल्या सग्यासोयऱ्यांच्या आठवणी जपून ठेवतो; पण त्यात कायमचे अडकून पडत नाही... म्हणून तर 'जगणं' चालू राहातं.' हा महान संदेश देत चित्रपट संपतो... पण खूप दिवस मनात रेंगाळत राहातो.

तुम्ही नेहमी पाहाता तसे नायक-नायिका चित्रपटात नाहीत; झगमगते सेट्स नाहीत, नाचगाणी नाहीत, तरीही हा चित्रपट मनाला झपाटून टाकतो. शेतकऱ्यांच्या अडचणी, आत्महत्या यांसारखे प्रश्नही येथे फार हळुवारपणे मांडले आहेत. टिंग्याच्या आई-बाबांचं मुलांवर प्रेम आहे; पण परिस्थितीमुळे टिंग्याचा हट्ट ते पुरवू शकत नाहीत. चितंग्याविषयी टिंग्याचं प्रेम त्यांनाही समजतंय; पण चितंग्याला विकावं लागणार हे सत्य ते नाकारू शकत नाहीत. युसुफ आणि काबा जिवाभावाचे दोस्त आहेत; पण युसूफ त्याला मदत करू शकत नाही. आत्याच्या घरी वांझोटी म्हणून होणारी उपेक्षा दाखवून दिग्दर्शक खेड्यातील समाजस्थितीचं दर्शन घडवतो. रशिदा आणि टिंग्या यांच्यातील निरागस मैत्री आणि टिंग्या आणि चितंग्या यांच्यातलं प्रेम; नानीचा आजार आणि चितंग्याचं जखमी होणं या एकमेकांना समांतर घटना मांडत दिग्दर्शक मंगेश हडवळे यांनी खेड्यातील गांजलेल्या शेतकऱ्याचे जीवन प्रेक्षकांपर्यंत पोहोचवले आहे. टिंग्याची भूमिका करणारा शरद गोयेकर हा अभिनय न शिकलेला साधा गावातलाच मुलगा! पण अतिशय सहज अभिनयाने, उत्कृष्ट बालकलाकार म्हणून राष्ट्रपती पुरस्कारासह अनेक पुरस्कार त्याला मिळवून दिले.

माणसामाणसांचे आपापसातील संबंध, गाई-गुरांचं शेतकऱ्याच्या जीवनातलं जिव्हाळ्याचं स्थान, गरिबीने शिकवलेलं शहाणपण या सगळ्याकडे एका लहान मुलाच्या नजरेतून टाकलेला दृष्टिक्षेप म्हणजे 'टिंग्या' हा चित्रपट! त्याची ही एक झलक! चित्रपटातील लहानलहान प्रसंगातून कथा कशी परिणामकारकपणे मांडली गेलीय, हे अनुभवण्यासाठी 'टिंग्या' हा चित्रपट जरूर पाहा; तुम्हाला काय वाटलं तेही जरूर कळवा!

••

**शैलजा देशमुख**
सी - १०२, पाटे संस्कृती, सहकारनगर क्र. २, पुणे - ९
sgdeshmukh50@gmail.com

पाऊस म्हणजे नसतो ताण। छत्री काढून फिरूयात छान।।
**प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली**

## १६ सप्टेंबर : आंतरराष्ट्रीय ओझोन संरक्षण दिन

दिन-विशेष




१६ सप्टेंबर २०१२ चा विषय : 'येणाऱ्या पुढच्या पिढ्यांसाठी वातावरणाचे (वातावरणातल्या ओझोन थराचे) संरक्षण करणे.' ह्या वर्षी (२०१२) ह्या कराराला २५ वर्षे झाली. १६ सप्टेंबर १९८७ रोजी मॉन्ट्रीयल येथे 'ओझोनचे संरक्षण करणे अत्यावश्यक आहे' ह्या कराराचा कच्चा मसुदा तयार झाला. १९९४ मध्ये युनायटेड नेशन्सच्या जनरल असेंब्लीने १६ सप्टेंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय ओझोन संरक्षण दिन' म्हणून घोषित केला, आणि कराराचा कच्चा मसुदा पक्का केला. भारतासह एकूण १९१ देशांनी ह्या करारावर सह्या केल्या आहेत.

मित्रांनो तुम्ही काय करू शकता? :-

- वातावरणातल्या कोणत्या भागात/थरात ओझोन वायू असतो त्या विषयीची माहिती शोधा. ओझोन वायूबद्दलची माहिती मिळवा.
- वातावरणातला ओझोनचा थर कशामुळे कमी होतो ती कारणे शोधून काढा.
- क्लोरोफ्लुरोकार्बन (CFC) हा वायू कोणकोणत्या उपकरणात वापरतात ते शोधा. ह्या उपकरणांचा वापर कसा कमी करता येईल ते उदाहरणांसह पटवून द्या.
- CFC वायू आणि 'अल्ट्रा व्हायोलेट किरण' यांच्यात रासायनिक प्रक्रिया काय होते आणि त्याचे दुष्परिणाम काय होतात? हे समजून घ्या.
- वातावरणातल्या ओझोनचे प्रमाण वाढते का? वाढत असल्यास ते का वाढते? ओझोनचे प्रमाण दिवसेंदिवस का कमी होत आहे, याची माहिती मिळवा. त्या संदर्भात 'पोस्टर्स' तयार करून शाळेच्या नोटीस बोर्डवर लावा.
- ओझोन थर मोजता येतो का? असल्यास कोणत्या उपकरणाने?

## २८ सप्टेंबर 'पर्यावरण रक्षण ग्राहक दिन'



२८ सप्टेंबर २०१२ चा विषय : 'आपला पैसा, आपले हक्क : पैशाच्या (खर्च करण्यात येणाऱ्या) योग्य मोबदल्याच्या (सत्य) खऱ्या निवडीसाठी चळवळ उभी करणे.'

'ग्राहक कोणतीही गोष्ट जेव्हा विकत घेतो तेव्हा त्याचा सकारात्मक किंवा नकारात्मक प्रभाव पर्यावरणावर पडतो' ह्या गोष्टीची (विधानाची) आठवण करून देण्यासाठी हा दिवस 'पर्यावरण- रक्षण ग्राहक दिन' म्हणून पाळण्यात येतो. आपण जसे आपल्या हक्कांबद्दल आणि जाणिवांबद्दल जागरूक असतो तसेच खरेदी करताना विकत घेतलेल्या मालामुळे (वस्तूंमुळे) पर्यावरणास धोका पोहोचणार नाही याची काळजी घेणे योग्यच आहे.

मित्रांनो तुम्ही काय करू शकता?

- तुम्ही खरेदी करता तेव्हा कोणत्या गोष्टी पर्यावरणाला धोका पोहचवू शकतात किंवा कोणत्या पोहचवू शकत नाहीत/शकणार नाहीत याची यादी करा.
- खरेदी केलेल्या वस्तू पर्यावरणाला बाधा आणणाऱ्या असतील तर त्या खरेदी करायच्या ऐवजी दुसरी खरेदी करता येईल का याचा विचार करा. पर्यावरणाला बाधा आणणाऱ्या वस्तू खरेदी करायच्याच नाहीत असा संकल्प करा.
- स्वत: निश्चय करा आणि तुमच्या आजूबाजूच्या लोकांनाही निश्चय करायला सांगा की पर्यावरणाला बाधा येईल अशी कोणतीही गोष्ट खरेदी करायची नाही.
- 'दैनंदिन पर्यावरण', 'हसरे पर्यावरण', 'हरित संदेश' ही पुस्तके वाचून पर्यावरणासंबंधी अजून जाणून घ्या.

••

- डॉ. कांचनगंगा गंधे
kanchan.gandhe@gmail.com



। अभिनंदन... युवा गायक राहुल देशपांडे - 'बालगंधर्व गुणगौरव पुरस्कार'।

प्रायोजक - श्री. अजित परांजपे, पुणे

## वाचलेच पाहिजे असे काही...




जयश्री काटीकर

पुस्तक पाहून आपण त्याच्या प्रेमात पडतो की ते वाचून? तुम्ही म्हणाल हा काय प्रश्न झाला? शिवाय पुस्तक न वाचता नुसतंच त्या पुस्तकाकडे पाहत बसलं तर लोकं काय म्हणतील याचीही कल्पना आहे मला! पण मध्यंतरी असंच एक पुस्तक भेट म्हणून मिळालं... इंगळहळीकर दाम्पत्याकडून... आणि हा प्रश्न मनात डोकावला. पुस्तक हातात आल्याक्षणापासून आपोआपच समोरचा जुना, किरकिरणारा, जड झालेला लाकडी दरवाजा उघडला गेला अन् समोरचा 'आसमंत' माझ्यासाठी खुला झाला.

आकाशाची पोकळी भरून फुललेली 'काटेसावर' (हेही एक बरंय, लेखकानं वेळोवेळी पुस्तकातल्या प्रकाशचित्रांमधल्या निसर्गाची अशी नावं लिहून 'ओळख' करून दिलेली आहे!) दिसली आणि खरंच 'आभाळ भेटल्यासारखं' झालं. नुकताच झाडावरून टपटप करून पडलेला प्रसन्न 'प्राजक्त' पाहून मनाला तजेला मिळाला. जिवाभावाचा 'बहावा' दिसला, जमिनीवर बेमालूम लपलेला 'रातवा' भेटला; कोरल स्नेक, सातभाई, टिटवी, तुरेवाल्या गरुडाचं पिल्लू, कंदीलपुष्प दिसले, 'नेवऱ्या'च्या फुलांची 'दिवेलागण' पाहिली. ज्ञात-अज्ञात, कधी कुठे नुसत्याच वाचलेल्या, कुणाकडून कधीतरी नुसतं ऐकलेल्या या आसमंतातल्या अनेकानेक गोष्टी तोच रंग, तेच रुपडं घेऊन या पुस्तकातून हुबेहुब प्रकटल्या. गुळगुळीत आर्ट पेपरवरच्या उत्कृष्ट, चाररंगी छपाईतून!

या 'आसमंता'तली आपल्याला प्रकाशचित्रातून भेटणारी ही सगळी मंडळी इतकी बोलकी - जिवंत आहेत की लेखक अजून या सगळ्यांबद्दल काय सांगणार आहे, याबद्दल जबरदस्त उत्सुकता निर्माण झाली. आणि म्हणूनच नुसतं चाळून पुस्तक बाजूला न ठेवता वाचायचीही घाई झाली. पुस्तक पाहून तर त्याच्या प्रेमात आपण पडतोच; पण ते वाचूनही परत त्या पुस्तकाच्या प्रेमात आपण पडतो.

मुखपृष्ठावरच्या उघडलेल्या लाकडी दरवाजातून बाहेर पडून खुल्या दिलाने 'आसमंता'त डोकावताना लेखकाची अनमोल साथ लाभली. आसमंतात डोकावण्याची वेगळी दृष्टी लेखकाने दिली, त्याची नव्यानं ओळख करून दिली.

आपल्या मनोगतात सुरुवातीलाच लेखक म्हणतो -

*'आसमंत दाराशी सुरू होतो. पायाखालच्या सावळ्या मखमलीपासून नक्षत्रांपर्यंत आसमंताच्या आविष्कारांकडे चौकस, संवेदनक्षम नजरेनं पाहिलं तर थक्क करणारी अनोखी अंतरंग उलगडतात...'* आणि शिवाय *'निसर्गात आश्चर्याचा साठा अमाप आहे. निसर्गाच्या लोभस प्रतिमा पाहायला कुठं दूरदेशी जायला नको. मंतरलेला आसमंत आपल्या दाराशीच आतुरतेनं साद घालतोय. त्याच्या आविष्कारांचा वेध घेण्यासाठी तरल मनाची कवाडं उघडा...' अशी अपेक्षा व्यक्त करतो.*

मोठमोठे कॅमेरे आणि भारीभक्कम दुर्बिणीपेक्षा आधी आपल्याजवळ चौकस नजर आणि संवेदनशील मन पाहिजे. तरच निसर्ग मुक्त हस्ताने उधळित असलेलं सौंदर्य आपल्यापर्यंत पोचेल, मनाला भिडेल! निखळ-निरागस आनंदानं ते बहरेल!! असा विश्वासही लेखक आपल्याला देतो. आपल्या आसपासच्या निसर्गातल्या वेगवेगळ्या घटकांचं हृद्य चित्रण या पुस्तकात आहे.

या पुस्तकातले लेख 'माझिया

मना', 'त्या फुलांच्या गंधकोषी', 'ही तर अक्षय नाती', 'फुलांच्याही देशा', आणि 'वेगवेगळी फुले उमलली' या पाच भागात विभागलेले आहेत.

लेखकाची आसमंताशी ओळख झाली ती लहानपणी वाड्यात बहरणाऱ्या प्राजक्ताच्या आणि वाड्याबाहेरच्या पिंपळाच्या रूपात! लाखोंच्या संख्येनं बहरणारा आणि तितक्याच सहजतेनं तो बहर खाली जमिनीवर रिता करणारा, पांढऱ्याचा हिरवा होणारा प्राजक्त! तर आपल्या अखंड सळसळीनं अस्वस्थ करणारा आणि आपल्या अंगाखांद्यावरच्या जैवविविधतेनं लेखकाचं अनुभवविश्व संपन्न करणारा हजारोंचा पोशिंदा पिंपळवृक्ष! ही दोन्हीही रूपं लेखकाच्या मनात आत खोलवर रुजलेली आहेत. त्यांचं असणं, बहरणं आणि कोसळणंही लेखकाबरोबर पाहताना आपणही अंतर्मुख होतो. 'माझिया मना' विभागातील लेखांमधून लेखकाचं आसमंताशी असलेलं हे दृढ नातं आपल्यासमोर उलगडत जातं.

निसर्गातील वेगवेगळ्या घटकांमधील हळुवार नाती, तितक्याच हळुवारपणे 'ही तर अक्षय नाती' या विभागातील लेखांतून आपल्याला कळतात. आपलंच बाळ समजून आपल्यापेक्षा दुप्पट आकाराच्या 'कोकिळेच्या बाळा'ला आपला पोटचा घास भरवणारा शिंजीर पक्षी, गरुडाच्या गगन 'भरारी'तून आपल्यापुढे उलगडलेला त्या कुटुंबाचा चित्तथरारक प्रवास किंवा 'या चिमण्यांनो...' मधून बालपणापासून आपल्या भावविश्वाशी जवळीक साधणाऱ्या चिऊताईला लेखकानं मारलेली आर्त हाक... या सगळ्यांतून निसर्गातल्या चिवट नात्याचा परिपाक आपल्यापुढं उभा राहतो!

निसर्गातल्या वेगवेगळ्या अधिवासांसंबंधी तपशीलवार माहिती 'दुर्ग धुरंदर', 'पुष्पपठार कास', 'स्मृतिवन', 'लेकुरवाळा माळ' या लेखांतून मिळते.

नेवऱ्याच्या फुलांची 'दिवेलागण' पाहण्यासाठी लेखकाने दाखवलेली चिकाटी, प्रयत्न असोत किंवा कोरल स्नेक हाताळण्याच्या 'विपरित बुद्धी'मुळे लेखकावर गुदरलेला प्रसंग असो, पुस्तक वाचताना लेखकाचं हे झपाटलेपण आपल्याला जाणवतं. 'आसमंत' वाचताना लेखकाच्या शैलीतला जिवंतपणा मनात भरतो. आपण कुठलंतरी माहितीवजा संकलन वाचतोय, असं अजिबात वाटत नाही. नाट्यमयता, उत्कंठावर्धकता लयबद्धता, चित्र जिवंत करणारी प्रभावी भाषा ही वाङ्मयीन मूल्यही लेखनात जाणवतात. जागोजागी विखुरलेल्या समर्पक काव्यपंक्तीही आपलं लक्ष वेधून घेतात.

या पुस्तकाला निसर्गमित्र मारुती चितमपल्ली यांची छोटी पण नेमकी प्रस्तावना आहे. इंगळहळीकर आपल्या भोवतालच्या 'आसमंता'शी आपली गट्टी करून देतात, आपलं बोट धरून चमत्कृती-विसंगती-विरोधाभास भरलेल्या जगतातून आपल्याला फिरवून आणतात; तर चितमपल्ली प्रस्तावनेतून पुस्तकातल्या आशयाशी-आसमंताशी आपली रीतसर ओळख करून देतात. नेमकी दिशा दाखवतात. आपल्या प्रस्तावनेत शेवटी ते म्हणतात- *'हा लेखसंग्रह फुलं, पाखरं, वृक्ष, लता, वेली अन् अद्‌भुत अशा कीटक -सृष्टीचा एक आगळा अनुभव देतो. जीवसृष्टीविषयी आपल्याला जिव्हाळा वाटू लागतो. यातच आसमंत पुस्तकाचं यश सामावलेलं आहे.'*

संपूर्ण पुस्तकभर आपल्याला जाणवत राहतं ते लेखकाचं झपाटलेपण, पक्षी-प्राणी-वनस्पती-कीटक-एकूणच निसर्गाकडे पाहण्याची त्याची डोळस, आस्थापूर्ण आणि पर्यावरणीय दृष्टी! आपल्या मनाची कवाडं उघडण्यासाठी म्हणूनच तुम्ही आम्ही सर्वांनी हे पुस्तक वाचलं-पाहिलं पाहिजे, आपला 'आसमंत' खुला केला पाहिजे. बरोबर ना?

**नाव :** आसमंत
**लेखक :** श्रीकांत इंगळहळीकर
**प्रकाशन :** करोला पब्लिकेशन्स, पुणे
**पृष्ठे : १८३, किंमत : रु. २२०**

●●

**– जयश्री काटीकर**
एफ – ३०१, रिव्हरव्ह्यू रेसिडेन्सी,
सनसिटी रस्ता, आनंदनगर, पुणे 411051
jayakatikar@gmail.com



। आदरांजली... श्री. विलासराव देशमुख - १४ ऑगस्ट २०१२
(केंद्रीय मंत्री व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री) ।
**प्रायोजक – श्री. विद्याधर सहस्रबुद्धे, डोंबिवली**

# सिंहावलोकन बाराव्या वर्षाचे


## वर्षभरातील मुखपृष्ठे


सौर आश्विन शके १९३३ ते सौर भाद्रपद शके १९३४ म्हणजेच ऑक्टोबर २०११ ते सप्टेंबर २०१२ या बाराव्या वर्षातील ही सर्व १२ अंकांची मुखपृष्ठे ! हे सगळे अंक तुमच्या संग्रही आहेत ना? खात्री करून घ्या. यातले कोणते मुखपृष्ठ तुम्हाला जास्त आवडलं आणि का हेही जरूर कळवा.


वर्ष १२ अंक १, सौर आश्विन



वर्ष १२ अंक २, सौर कार्तिक (दीपावली विशेषांक)


वर्ष १२ अंक ३, सौर अग्रहायण



वर्ष १२ अंक ४, सौर पौष


वर्ष १२ अंक ५, सौर माघ


वर्ष १२ अंक ६, सौर फाल्गुन



वर्ष १२ अंक ७, सौर चैत्र (वासंतिक विशेषांक)


वर्ष १२ अंक ८, सौर वैशाख


वर्ष १२ अंक ९, सौर ज्येष्ठ (अनुवाद विशेषांक)


वर्ष १२ अंक १०, सौर आषाढ


वर्ष १२ अंक ११, सौर श्रावण (प्रबोधिनी विशेषांक)


वर्ष १२ अंक १२, सौर भाद्रपद

ज्ञानाची शिदोरी सरते ना कधी।
पेरते व्हा आधी जागोजागी ॥

**सौर आश्विन शके १९३३ ते सौर भाद्रपद शके १९३४ (इसवी सन २०११-२०१२)**

| **वर्षभरातील लेखांचा आढावा : संख्यात्मक सारणी (वर्षभरात येऊन गेलेले एकूण साहित्य)** | | |
|---|---|---|
| कथा - २४ | कृतिपर-कला - ९ | सर्वांगीण विकसन - ३ |
| कविता - ३१ | कृतिपर-विज्ञान/प्रकल्प- २ | लेखमाला -३ (एकूण लेख- २२) |
| ललित - २१ | व्यक्तिपरिचय- १० | संकीर्ण - २४ |
| गंध मोहवी काव्याचा - ४ | भटकंती - २ | **लेखक/कवी/चित्रकार - १७७** |
| माहितीपर - १६ | जरूर वाचा/पाहा - ५ | **एकूण पृष्ठसंख्या : ५८०** |

### विशेषांक

**अनुवाद विशेषांक -** यावर्षीचा सौर ज्येष्ठचा (जून) अंक अनुवाद विशेषांक होता. प्रादेशिक आणि परदेशी अशा दहा वेगवेगळ्या भाषांमधील भाषांतरित साहित्य या अंकात देण्यात आले होते. कथेबरोबरच कविता, ललित, माहितीपर, चित्रपट रसास्वाद इ. वेगवेगळ्या साहित्य प्रकारांचा अंकात समावेश करण्यात आला. भौगोलिक परिस्थिती बदलली, भौगोलिक अंतर बरेच असले तरी मानवी भावभावना, अभिव्यक्ती ही सारखीच असते. हे या अनुवाद विशेषांकाच्या निमित्ताने कुमारवाचकांपर्यंत पोहोचवता आले.

**प्रबोधिनी विशेषांक -** ज्ञान प्रबोधिनी या संस्थेची स्थापना ८ ऑगस्ट १९६२ या दिवशी झाली. प्रबोधिनीचं २०१२-१३ हे वर्ष सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. त्या निमित्ताने सौर श्रावणचा (ऑगस्ट) अंक 'प्रबोधिनी विशेषांक' म्हणून प्रकाशित करण्यात आला. प्रबोधिनी 'शाळा' म्हणून अनेकांना माहीत असते. पण 'रूप पालटू देशाचे' हे ध्येय उराशी बाळगून समाजातील अनेकविध क्षेत्रात प्रबोधिनीचा असलेला कार्यविस्तार, विविध मनोगतांद्वारा या अंकात मांडण्यात आला आहे. ज्ञानप्रबोधिनीची ओळख यानिमित्ताने कुमारवाचकांना होईलच; शिवाय अनेक दिशांनी विस्तारणाऱ्या प्रबोधिनीत कुणीही वेगवेगळ्या उपक्रमांद्वारे सहज सहभागी होऊ शकतो; जबाबदारी घेऊन कामाला भिडू शकतो आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा खऱ्या अर्थाने विकास करू शकतो. याचीही जाणीव विद्यार्थ्यांना होईल, असा विश्वास वाटतो.

### लेखमाला

१) **प्रकल्पाची कमाल शिकण्यातली धमाल -** 'प्रकल्पातून शिक्षण' या उद्देशाने सुरू केलेल्या या लेखमालेतील ७ लेख या वर्षी अंकातून प्रकाशित करण्यात आले. प्रकल्पांविषयी समंजस, प्रगल्भ जाणीव विकसित व्हायला निश्चितच या लेखमालेची आणि गतवर्षीच्या प्रकल्प विशेषांकाची (सौर भाद्रपद शके १९३३) विद्यार्थ्यांना मदत झाली असेल.

२) **उजळती वाट -**आयुष्यात 'मोठ्ठं व्हावं, पराक्रम करावा, नाव कमवावं' असं शालेय वयात प्रत्येकालाच वाटत असतं. हे वाटणं विरून न जाता ते वास्तवात उतरवण्यासाठी आणि फक्त 'स्वार्था'पुरतं न जगता, अनेकांच्या उपयोगी पडणारं आयुष्य जगण्यासाठी शालेय वयात निश्चयपूर्वक काही व्रतांचा अंगीकार करायला हवा. यासाठी ज्ञान प्रबोधिनी अनेक वर्षांपासून विद्याव्रत संस्कार योजत आली आहे. 'छात्र प्रबोधन'च्या वाचकांना या व्रतांची ओळख व्हावी आणि त्याचे आचरण कसे करावे हे त्यांना कळावे म्हणून 'उजळती वाट' ही लेखमाला या वर्षी अंकातून प्रसिद्ध करण्यात आली. या लेखमालेतील सर्व लेख डॉ. स्वर्णलता भिशीकर या प्रबोधिनीच्या कार्यकर्त्या व या विषयाचे सखोल चिंतन असलेल्या सिद्धहस्त लेखिकेने लिहिले आहेत.

३) **चित्रगोष्टी -** चित्रांचे प्रकार, त्यातली रंगसंगती, चित्र काढतानाचे काही अनुभव, चित्रांचा संस्कार, या सगळ्या 'चित्र'गोष्टींबद्दल मुलांशी संवाद शिवाय चित्रकलेच्या परीक्षांसाठी मुलांना या लेखमालेतून



। दिनविशेष... २७ सप्टेंबर जागतिक पर्यटन दिन ।
। दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा।
।प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे ☎ ९४२२०१७१७५

मार्गदर्शनही करण्यात येत आहे. या वर्षात ६ लेख प्रकाशित झाले असून ते सर्व ज्येष्ठ चित्रकार चित्रा वैद्य यांच्या लेखणीतून उतरले आहेत.

**सर्व दिवाळी अंक, १ ते १२ वर्षातील सर्व अंकांची एकत्र डिव्हिडी** (किं. रु. १२५) **लवकरच उपलब्ध. स्थानिक केंद्रांवर नोंदणी करा.**

## ‘छात्र प्रबोधन’च्या स्पर्धा व उपक्रमांचा संक्षिप्त आढावा

* **दिवाळी अंक –** ‘छात्र प्रबोधन’तर्फे मराठी, इंग्रजी, ग्रामीण, युवोन्मेष तसेच बोलका अंक व संगणकीय असे ६ दिवाळी अंक प्रसिद्ध झाले व ते प्रकाशनपूर्व नोंदणीद्वारा स्थानिक स्वयंसेवी केंद्रप्रमुख व कार्यकर्ते यांच्याद्वारा १२० गावांमधल्या ३८,००० घरांमध्ये पोहोचले.
* **सृजनाला पंख नवे स्पर्धा (सादरीकरण स्पर्धा)–** छात्र प्रबोधनच्या वर्ष ११-१२ (इ.स. २०१०-११) मधील अकांमधल्या साहित्यावर आधारित शालेय विद्यार्थ्यांसाठी ‘सृजनाला पंख नवे’ ही सादरीकरणाची सांघिक स्पर्धा यावर्षीही आयोजित करण्यात आली. स्पर्धेत पुण्यातील व पुण्याबाहेरच्या एकूण ७ शाळांमधील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. (वृत्त अंक ७ मध्ये)
* **‘तुम्हीच संपादक व्हा!’ हस्तलिखित स्पर्धा –** ‘छात्र प्रबोधन’तर्फे सातवी ते दहावी या वयोगटासाठी हस्तलिखित स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण १९ गटांनी भाग घेतला. प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ असे क्रमांक काढून त्यांना पुस्तक रूपाने बक्षिसे पाठविण्यात आली. (वृत्त अंक ७ मध्ये)
* **‘प्रकल्पाची कमाल शिकण्यातली धमाल’ प्रकल्प स्पर्धा –** ‘छात्र प्रबोधन’तर्फे प्रकल्प स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ५ गटांचा सहभाग होता. यशस्वी चार गटांना पुस्तकरूपाने बक्षिसे देण्यात आली. (वृत्त अंक ८ मध्ये)
* **ग्रामीण मेळावे –** छात्र प्रबोधनच्या विविध केंद्रांमार्फत ग्रामीण भागात २४ ठिकाणी (ग्रामीण दिवाळी अंकावर आधारित) मेळावे घेण्यात आले. या मेळाव्यांमधून इयत्ता सातवी ते नववीतील सुमारे १२०० विद्यार्थी सहभागी झाले होते. अंकातील साहित्यावर आधारित सादरीकरण, कवितेला चाल लावणे, अभिवाचन, मुलाखत घेणे, नाट्यरूपांतर इ.विषयी मार्गदर्शन करणे, अंकातील लेखावर चर्चा करणे, लेखक तुमच्या भेटीला या अंतर्गत एखाद्या लेखकाशी तेथील मुलांचा दूरभाष/भ्रमणभाषद्वारा प्रत्यक्ष संवाद घडवून आणणे असे या मेळाव्याचे स्वरूप होते. असे मेळावे पावस, फुणगुस, आंबा, पासली, कल्याण अशा अनेक ठिकाणी झाले.
* **प्रबोधन तासिका –** छात्र प्रबोधनच्या अंकातील साहित्याचा वापर औपचारिक शिक्षण पद्धतीत वाढावा यासाठी शहरी व ग्रामीण भागात प्रबोधन तासिका घेण्यात आल्या. ग्रामीण भागातील पासली व कल्याण येथील शाळांमध्ये व शहरी भागात मा. स. गोळवलकर गुरुजी शाळा, पुणे येथे या तासिका घेतल्या.
* **प्रकाशने –** ‘छात्र प्रबोधन’तर्फे या वर्षी एकूण १० पुस्तके प्रसिद्ध करण्यात आली.
  - **प्रथम आवृत्ती–** बकुळफुलं (ललित लेखसंग्रह), गंमत मोठ्ठं होण्यातली (१२ वर्षापर्यंच्या मुलांच्या पालकांसाठी).
  - **द्वितीय आवृत्ती –** अलगुज, केवड्याचं पान, शब्दांची रत्ने
  - **पुनर्मुद्रण–** बुद्धिवैभव, आयुष्यातील वादळलाटा, आश्वासक पालकत्व, गीता-गीताई, हसत खेळत भाग २

*(यावर्षीचे सिंहावलोकन थोडे वेगळ्या पद्धतीने केले आहे. लेख-लेखक/कवी अशी यादी न देता काही मोजके, आवश्यक संदर्भच दिले आहेत. ज्यांना तपशिलवार नोंदी बघायच्या आहेत, त्यांनी जरूर छात्र प्रबोधनच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.)*

आई, मॉ, मम्मी, माय, आहेत साऱ्या माउली।
झाडांना नावे कितीही तरी मिळतेच किहो साऊली॥

## मलपृष्ठ पद्य 'जय वीरेश्वर'चा अर्थ

स्वामी विवेकानंदांचं गुणगान करणाऱ्या, त्यांच्या पायाशी आश्रय मागणाऱ्या या पद्यातील काही अवघड शब्दांचे अर्थ इथे देत आहोत. तुमचा तुम्हाला याचा अर्थ जरूर जाणून घेता येईल. तुम्हाला कळलेला अर्थ आमच्यापर्यंत नक्की पोचवा.

***वीरेश्वर –*** *वाराणसीतील वीरेश्वर शिवाची उपासना स्वामीजींच्या आईने केली होती. त्यामुळे स्वामीजींचे नावही 'वीरेश्वर' असे ठेवले गेले होते.,* ***वंग भूमिसुत –*** *वंग भूमीचा पुत्र,* ***उत्पल लोचन –*** *कमलासारख्या नेत्रांचा*
***देहि पदं –*** *चरणांशी आश्रय दे ।।१ ।।*
***परम ऋषिवर –*** *श्रेष्ठ ऋषीवर,* ***ध्यान परायण –*** *ध्यान मग्न,* ***श्यामल विग्रह –*** *सावळ्या वर्णाची मूर्ती,*
***गुणीजन रंजन –*** *गुणी जणांसाठी आकर्षक।।२ ।।*
***सुस्वर शब्दक –*** *गोड गळ्याचा,* ***महायोगिवर –*** *श्रेष्ठ योगी ।।३।।*
***गौतमभक्त –*** *भगवान गौतम बुद्धांचा भक्त,* ***अमृतदीधिती –*** *अमृताचा किरण,*
***वियन्मणि: इव –*** *दिनमणी म्हणजे सूर्यासारखा,* ***वन्हिशायक –*** *अग्नीचा (जणू) बाण।।४ ।।*
***संघ प्रदर्शक –*** *संघाला मार्गदर्शन करणारा,* ***ईश्वरभावन –*** *ईश्वराच्या विचारात गढलेला,*
***रामकृष्ण गत –*** *रामकृष्णांना समर्पित,* ***क्षान्त्यनुगामी –*** *क्षमेचा मार्ग अनुसरणारा।।५ ।।*

१

## ओळखा पाहू मी कोण?

(तुमच्या पुस्तकातून भेटणाऱ्या वेगवेगळ्या कीटक,प्राणी, शरीरातले वेगवेगळे घटक यांच्यावर आधारित **'ओळखा पाहू मी कोण?'** या सदरात या अंकापासून कोडी देत आहोत. ज्येष्ठ अभ्यासक **डॉ. पुरुषोत्तम जोशी** यांनी ती खास तुमच्यासाठी तयार केली आहेत.)

वेटोळ्यांची सोंड माझी,
सोडवली वेटोळी अन्
केली लांबसर तिला !
तिनं मग केली,
न्याहारी, सूर्याच्या फुलावर !
खवले पंखी मी - मज स्पर्श दोन
अन् सहा पाय !
**सांगा बरं आहे मी कोण?**

## मुखपृष्ठ चित्रकार



नाव – चित्रा वैद्य
जन्म – २१ मे १९६५
**शैक्षणिक पात्रता** – BFA / Dip. A.Ed. (सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टस्, मुंबई)
M.A.(painting) (एस.एन.डी.टी., मुंबई)

लिपीकार एल. एस. वाकणकर आणि भीमबेटका गुहांच्या संदर्भात काम करणारे प्रसिद्ध चित्रकार विष्णू वाकणकर यांच्या समृद्ध परंपरेचा वारसा चित्रकार चित्रा वैद्य यांना मिळाला. वेगवेगळे विषय निवडून त्यानुसार आपल्या खास शैलीत चित्रांकन करणे त्यांना विशेष आवडते. त्यांच्या चित्रविषयांची विविधता; त्यांची सर्जनशीलता आणि नवीन काहीतरी करत राहण्याचा ध्यास अधोरेखित करते. आत्तापर्यंत त्यांची सुमारे १५ वैयक्तिक आणि सांघिक चित्र प्रदर्शने वेगवेगळ्या प्रख्यात गॅलरींमधून भरलेली आहेत.

चित्रांमध्ये एखादा विषय केवळ दृश्य स्वरूपात मांडणं इतकंच चित्रकलेतून अभिप्रेत नाही तर त्या विषयाच्या सर्वछटा चित्रात प्रतिबिंबित व्हाव्यात असे चित्रकर्तीला वाटते. त्यांची ही श्रद्धा आणि हा दृष्टिकोण हेच त्यांच्या कामाचं वेगळेपण आहे.

('छात्र प्रबोधन'मधील 'चित्र गोष्टी' या लेखमालिकेच्या लेखिका)

ए-३/श्रीकुंज सोसायटी, हनुमान मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई -57
info@artist-chitra.com, जरूर भेट द्या –www.artist-chitra.com



। जरूर ऐका... गणपती तू गुणपती तू... - गीत जगदीश खेबुडकर - गायक पं. वसंतराव देशपांडे ।
प्रायोजक – श्री. सुधीर विष्णु दफ्तरदार, पुणे

## छात्र प्रबोधन दिवाळी अंक २०१२ प्रकाशनपूर्व नोंदणीसाठी स्थानिक केंद्रे

प्रिय प्रबोधक,

'छात्र प्रबोधन'च्या दिवाळी अंकाची तुम्ही आणि सारा महाराष्ट्र आतुरतेनं वाट बघत असतो. अत्यंत दर्जेदार असा आपला यावर्षीचा दिवाळी अंक तयार होतो आहे. कोणतेही कमिशन न घेता, स्वयंसेवी वृत्तीने महाराष्ट्रभरातले सदस्य अत्यंत मन:पूर्वक आपल्यापर्यंत हा अंक पोहोचावा म्हणून काम करीत असतात.

खालील शहरांत/गावांत छात्र प्रबोधनचे काम करणारे काका-काकू किंवा ताई-दादा आहेत. यावर्षी दिवाळी अंकाच्या जास्तीत जास्त नोंदणीसाठी तुम्हीही त्यांच्याबरोबर सहभागी होणार ना? छात्र प्रबोधनचा दिवाळी अंक आपल्या अनेक मित्र-मैत्रिणींना सवलतीच्या दरात नोंदवायला सांगा. तसेच इतरही अंकांची नोंदणी तुमच्यासाठी व तुमच्या परिचयातल्या व्यक्तींसाठी आवर्जून करा. १० सप्टेंबरपूर्वी दिवाळी अंकाचे प्रचार साहित्य खालील केंद्रांवर उपलब्ध असेल. तुम्ही त्याचाही उपयोग करून तुमच्या शाळेत व परिसरात नोंदणी करू शकता. तसेच छात्र प्रबोधनद्वारा प्रकाशित पुस्तके (सूची मलपृष्ठाच्या आतील पानावर दिली आहे.) व २०१३ च्या सौर दिनदर्शिकेची नोंदणीही करू शकाल.

ज्या गावांमध्ये वितरण केंद्रे नाहीत, त्या गावांमधील सभासदांना साध्या पोस्टाने अंक पाठविले जातील. अंक न मिळाल्यास वेगळा अंक पाठवला जाणार नाही. ज्या सभासदांनी रजिस्टर पोस्टाने दिवाळी अंक पाठविण्यासाठी रु. ४०/- जादा भरले आहेत त्यांनाच दिवाळी अंक खात्रीशीरपणे पाठविले जातील.

**मराठी** अंकाबरोबरच **इंग्रजी**, **ग्रामीण**, '**युवोन्मेष**' हे चार अंक शिवाय **संगणकीय आवृत्ती** आणि **बोलका अंकही** प्रकाशित होणार आहे.

### विभाग १. बोरीवली (प. मुंबई)

| | | |
|---|---|---|
| बोरीवली | - सौ. सुमिता पांढरे | ☎ ९९६९०५१५७३ |
| विलेपार्ले | - श्री. दत्तात्रय जोशी | ☎ ९८६९०६३७७२ |
| बांद्रा | - श्री. मिलिंद चिंदरकर | ☎ ९३२२२४२५६९ |
| गिरगाव | - श्रीमती शिरीषा खरे | ☎ २२-२३८८६९३५ |
| चेंबूर | - कु. मधुरा पंडित | ☎ ९८६९४५०००१ |
| विरार-वसई | - श्री. फ्रान्सिस डिमेलो | ☎ ९८५०१८२६६१ |
| पालघर | - श्री. तुषार राऊत | ☎ ९८६०२०३१०० |
| दादर | - श्री. सतीश पै | ☎ ९८२०२६७३२७ |
| अंधेरी | - सौ. धनश्री शिंदे | ☎ ९७०२५२७२८४ |

### विभाग २. डोंबिवली (मध्य मुंबई, ठाणे)

| | | |
|---|---|---|
| ठाणे | - सौ. सुप्रिया बर्वे | ☎ ०२२-२५३६४३६४ |
| डोंबिवली | - सौ. स्मिता चावरे | ☎ ९९३०१४५२११ |
| कल्याण | - सौ. स्मिता मनोरे | ☎ ९९२०९४८७७८ |
| अंबरनाथ | - सौ. अश्विनी कुलकर्णी | ☎ २५१-२६०१४११ |
| बदलापूर | - श्री. चिंतामणी उगले | ☎ ९६५७०३०९५४ |

### विभाग ३. अलिबाग (रायगड, नवी मुंबई)

| | | |
|---|---|---|
| अलिबाग | - श्री.राम जोशी | ☎ ९४२०८३५६५० |
| नागाव | - सौ. स्नेहा जोशी | ☎ २१४१-२४५६६१ |
| नागोठणे | - सौ. सुलभा गोखले | ☎ २१९४-२७७९०३ |
| मुरुड | - सौ. दीपाली जोशी | ☎ ९९६०८६६१७७ |
| महाड | - श्री. डी. एस्. सावंत | ☎ ९८२२६२६९३२ |
| रसायनी | - सौ.शुभदा कोकीळ | ☎ ९८८१९०३६७३ |
| वाशी | - सौ. विजयालक्ष्मी पाटगावकर | ☎ २२-२७८०१९६८ |

### विभाग ४. रत्नागिरी (रत्नागिरी, सिंधुदुर्ग )

| | | |
|---|---|---|
| रत्नागिरी | - सौ. प्रतिभा प्रभुदेसाई | ☎ २३५२-२२२९५३ |
| पावस | - सौ. शीतल सामंत | ☎ ९४२११३९५३० |
| चिपळूण | - श्री. प्रसाद काणे | ☎ ९४२२४३०९०० |
| राजापूर | - श्री. संजय कुलकर्णी | ☎ ९४२१२२९७५७ |
| खेड | - सौ. नम्रता दामले | ☎ ९४२२४३३९४९ |
| कुडाळ | - श्री. उमेश सामंत | ☎ ९४२२९६३५१७ |
| सावंतवाडी | - सौ. वंदना करंबेळकर | ☎ ९८५०४७३०१२ |
| कणकवली | - श्री. औदुंबर भागवत | ☎ ९४२११४७५१३ |

### विभाग ५. फोंडा (गोवा)

| | | |
|---|---|---|
| फोंडा | - श्री. मोहन आमशेकर | ☎ ९४२२०५८८७३ |
| मार्दोळ | - श्री. शिरीष आमशेकर | ☎ ९४२११५८९२२ |
| मडगाव | - सौ. विनया शिंक्रे | ☎ ९४२३८२०३३२ |
| वास्को | - सौ. दिपा गावकर | ☎ ९९२१८९७०९६ |
| डिचोली | - श्री. गणेश जोशी | ☎ ९४०५९२१२३१ |

### विभाग ६. इचलकरंजी (कोल्हापूर)

| | | |
|---|---|---|
| इचलकरंजी | - श्री.विनायक गद्रे | ☎ ९८८१५९००१८ |
| कुरुंदवाड | - श्री. गोपाळ जोशी | ☎ ९८५०९६४८१९ |

क्षितिजावर 'केशर' येतो, रोज घेवूनी 'सकाळ'।
'गुलाल' उधळून तळ्याकाठी, माखुन येते 'संध्याकाळ'।।

हुपरी - सौ. सुधा सांगवडेकर ☎ ९०२८८५२०५२
महागाव - श्री. सुभाष सुतार ☎ ९०९६७१२८१३

**विभाग ७. सांगली**

सांगली - श्री. शैलेंद्र केळकर ☎ ९४२२६१६०५८
तासगाव - श्री. प्रसाद हसबनीस ☎ ९४२३८१०४०९
३२ शिराळे- श्री. नाथाराव हसबनीस ☎ ९७६७६८०७०१
कडेगाव - डॉ. मकरंद बर्वे ☎ ९९२२२१२९०३
इस्लामपूर - सौ. स्वाती कुलकर्णी ☎ ९४०४३५९२६२
मिरज - डॉ. श्रीकांत कुलकर्णी ☎ ९३७२२२३४८७

**विभाग ८. सातारा**

सातारा - श्री. सतीश कुलकर्णी ☎ ९४२३२६०२६०
कोरेगाव - डॉ. मिलिंद शहा ☎ ९८२२०२३२०८
कराड - श्री. दत्तात्रय कुलकर्णी ☎ २१६४-२२२५०५
उंब्रज - डॉ. धनंजय कुलकर्णी ☎ ९०३५४६९१३
खंडाळा - श्री. अ. ल. फाळके ☎ ९८९०६०९६३१
पाटण - श्री. दत्तात्रय नांगरे ☎ ८२७५४५७२७८
खटाव वडूज-सौ. पूनम शिंदे ☎ ९९७५५९९८५१

**विभाग ९. सोलापूर**

सोलापूर - ज्ञान प्रबोधिनी ☎ ९६८९९९९२००
पंढरपूर - श्री. दीपक इरकल ☎ ९४०३२९३२९१
मोहोळ - श्री. बापूसाहेब दळवे ☎ ९८५०३६३४८८

**विभाग १०. कर्जत (अहमदनगर)**

नगर - सौ. स्नेहल धर्माधिकारी ☎ ९४२२०८४६१३
संगमनेर - श्री. अशोक भारंबे ☎ ९९२१६४४२११
कोपरगाव - डॉ. अंजली फडके ☎ ९३२५९५०१२१
शिर्डी - डॉ. प्रबोध जोशी ☎ ९४२१५५८४६६
कर्जत - श्री. गजानन चावरे ☎ ९९६०११८५८६
पारनेर - सौ. सविता रेपाळे ☎ ९९२२२५१६६७

**विभाग ११. उत्तर महाराष्ट्र**

नाशिक - श्री. अनिल दंडगव्हाळ ☎ ९४२२२४८२६४
दोंडाईचा - श्री. सुभाष जैन ☎ ९८२३४१६८४४
धुळे - श्री. एन. एम. जोशी ☎ ९४२१५००८८२
देऊर बु।। - श्रीमती स्वरूपा देवरे ☎ ७५८८६२८८११
जळगाव - श्री. अनिल भोळे ☎ ९४२०६६२७१४
चोपडा - श्री. सुधाकर केंगे ☎ ९४२३९१५५२९
चाळीसगाव- डॉ. मुकुंद करंबेळकर ☎ ९८२२२६३२७९
भुसावळ - श्री. अनिल जोशी ☎ ९३२६११८०२८

**विभाग १२. मराठवाडा**

कन्नड - श्री. प्रशांत कोटकर ☎ ९४२१५१४६७६
जालना - श्री. विजय देशमुख ☎ ९४२३४५७६५५
बीड - श्री. कैलास लिंगे ☎ ९८८१४५१३५७
अंबाजोगाई - ज्ञान प्रबोधिनी ☎ ९९६०४०३१४४
माजलगाव - श्री. निरंजन वाघमारे ☎ ९८८१८६७१२३
धाराशिव - श्री. बालाजी माळी ☎ ९४०३३९११०६
हराळी - ज्ञान प्रबोधिनी ☎ २४७५-२६०१०२
औरंगाबाद - चि. शुभम जोशी ☎ ९७६५०७९४५६
वसमतनगर- श्री. जी. आर.आर्कलिवाड ☎ ९८२२८८८३०६

**विभाग १३. विदर्भ**

अकोला - श्री. भूषण बापट ☎ ९८५०३८६४९४
वाशीम - डॉ. सुनिता घुडे ☎ ९८२२२०४५१५
अमरावती - श्री. प्रदीप व्यवहारे ☎ ९८६०६७४७७२
चंद्रपूर - श्री. मुकुंद घरोटे ☎ ९०११६३१६५८
उमरखेड - श्री. धनंजय कुदे ☎ ९४०३४६००४८
यवतमाळ - श्री. उदय नवलेकर ☎ ९३७२६५०४५२

**विभाग १४. पुणे**

पुणे शहर - छात्र प्रबोधन मुख्य केंद्र ☎ २०-२४२०७१७४
निगडी - ज्ञा.प्र. नवनगर विद्यालय ☎ २०-२७६५४३८०
चिखली - श्री. गौतम इंगळे ☎ ९७३०२३७३८८
साळुंब्रे - ग्राम प्रबोधिनी विद्यालय ☎ २११४-२२३३७१
शिवापूर - श्री. संजीव तागडे ☎ २०-२४३८४०१३
इंदापूर - श्री. तुषार रंजनकर ☎ ९४२२३२९६१६
चाकण - डॉ. अविनाश अरगडे ☎ ९४२३५७१५५२
बारामती - सौ. मयुरा कानिटकर ☎ ९४२३५८४३२४
सासवड - सौ. कल्पना खांडेकर ☎ ९४२३२०८१०१

**अधिकाधिक गावांमध्ये छात्र प्रबोधनची नोंदणी व वितरण केंद्रे व्हावीत यासाठी सभासदांना आवाहन!**

गतवर्षी वितरण केंद्र असलेल्या खालील गावांमध्ये सभासदांची संख्या वाढल्यास स्थानिक व्यक्तींच्या माध्यमातून तिथे वितरण केंद्र सुरू होईल. त्यासाठी त्या त्या गावातील सभासदांनी सभासद वाढीसाठी प्रयत्न करावेत.

**खोपोली, पणजी, साखळी, कोल्हापूर, तासगाव, शिरपूर, लांजा, पूर्णा, जिंतूर, नांदेड, अकोट, वाशिम, सुरत, बंगलोर**

वरील गावांव्यतिरिक्त अन्य गावांमध्ये छात्र प्रबोधन दिवाळी अंकांची नोंदणी व वितरण स्वयंसेवी वृत्तीने करू इच्छिणाऱ्या व्यक्तिंचे मनापासून स्वागत! त्यांनी आपापल्या गावात किमान ५ सभासद व ५० दिवाळी अंकांची नोंदणी करावी ही अपेक्षा. इच्छुकांनी त्वरीत मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा. (श्री. रवींद्र भोसले - ९८५०७३१०७१) त्यांना आवश्यक ते प्रचार व नोंदणी साहित्य अन्य तपशील पाठवले जातील.



हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० भाद्रपद, शके १९३४, १ सप्टेंबर २०१२ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे-२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

## मुक्तहस्तचित्र

चित्रकार - चित्रा वैद्य, संदर्भ - अंकातील चित्रगोष्टी, पान क्र. ११-१२



### स्वामी विवेकानंद आणि सर्वधर्मपरिषद (स्मरणदिन ११ सप्टेंबर)









सर्वधर्म परिषदेचे शिकागोतील सभागृह आणि स्वामी विवेकानंद पथ (संदर्भ - पान क्र. ६, प्रकाशचित्रे - डॉ. छाया पाटील)

सौर भाद्रपद, शके १९३४/सप्टेंबर २०१२, पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
पंजीकरण क्रमांक (RNI NO.)MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**

## जय वीरेश्वर

जय वीरेश्वर वंगभूमिसुत उत्पललोचन देहि पदम् ।
जय वीरेश्वर विवेकभूषण आनन्दाकर देहि पदम् ।।१।।

जय वीरेश्वर परमऋषिवर ध्यानपरायण देहि पदम् ।
जय वीरेश्वर श्यामलविग्रह गुणीजनरञ्जन देहि पदम् ।।२।।


जय वीरेश्वर ज्ञानोपासक सुस्वरशब्दक देहि पदम् ।
जय वीरेश्वर महायोगिवर शंकरपूजक देहि पदम् ।।३ ।।

जय वीरेश्वर गौतमभक्त अमृतदीधिति देहि पदम् ।
जय वीरेश्वर वियन्मणिरिव वन्हिशायक देहि पदम् ।।४ ।।

जय वीरेश्वर संघप्रदर्शक ईश्वरभावन देहि पदम् ।
जय वीरेश्वर रामकृष्णगत शान्त्यनुगामी देहि पदम् ।।५ ।।



स्वामी विवेकानंद
शतकोत्तर सुवर्णजयंतीनिमित्त
त्यांच्या विचारांवर आधारित
गीतमाला –८



| सौर दिनदर्शिका शके १९३४ | सप्टेंबर २०१२ | भाद्रपद आश्विन |
|---|---|---|
| श. | 1 | १० |
| र. | 2 | ११ |
| सो. | 3 | १२ |
| मं. | 4 | १३ |
| बु. | 5 | १४ |
| गु. | 6 | १५ |
| शु. | 7 | १६ |
| श. | 8 | १७ |
| र. | 9 | १८ |
| सो. | 10 | १९ |
| मं. | 11 | २० |
| बु. | 12 | २१ |
| गु. | 13 | २२ |
| शु. | 14 | २३ |
| श. | 15 | २४ |
| र. | 16 | २५ |
| सो. | 17 | २६ |
| मं. | 18 | २७ |
| बु. | 19 | २८ |
| गु. | 20 | २९ |
| शु. | 21 | ३० |
| श. | 22 | ३१ |
| र. | 23 | आ. १ |
| सो. | 24 | २ |
| मं. | 25 | ३ |
| बु. | 26 | ४ |
| गु. | 27 | ५ |
| शु. | 28 | ६ |
| श. | 29 | ७ |
| र. | 30 | ८ |

पत्त्यामध्ये वर्गणीचा कालावधी 12-12/Sept. 12 असल्यास तुमची वर्गणी संपली आहे, ती त्वरीत भरावी. पत्त्यामध्ये चुका असल्यास तातडीने कळवा.

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
**या अंकाची किंमत : ₹ १५/–**
**वार्षिक वर्गणी : ₹ १८०/–**
**प्रकाशन दिनांक :**
सौर १० भाद्रपद, शके १९३४
१ सप्टेंबर २०१२
**www.chhatraprabodhan.org**
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति –